# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड बुधवार । दि. १७ जून २०२६ । अंक ११ । पृष्ठे ८ । किंमत ४ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## शेतकरी नुकसान भरपाईच्या प्रतीक्षेत

**तळा :** तळा तालुक्यातील तारस्ते येथे विजेचा शॉक लागून मृत पावलेल्या तीन बैलांची अद्याप सात महिन्यांनंतरही नुकसान भरपाई मिळालेली नसल्याने मृत बैलांचे मालक अद्यापही नुकसान भरपाईच्या प्रतीक्षेत आहेत. याबाबत सविस्तर माहिती अशी की, तळा तालुक्यातील तारस्ते येथील धर्मा रामा भौड यांचे दोन बैल व अशोक तुकाराम मोरे यांचा एक बैल दि.२० ऑक्टोबर २०२५ रोजी मौजे मांदाड गावच्या हद्दीत चरण्यासाठी गेले असता महावितरण विभागाच्या विद्युत खांबावरील तुटलेल्या तारेचा शॉक लागून तिन्ही बैल जागीच मृत्युमुखी पडले. यामुळे संबंधित शेतकऱ्यांचे •> पान २ वर

## प्रवीण पांडे नवे पोलीस निरीक्षक

**रायगड :** अलिबाग पोलीस ठाण्याचे नवे पोलीस



निरीक्षक म्हणून प्रवीण पांडे यांनी कारभार हाती घेतला आहे. आता अलिबाग शहरासह ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याची जबाबदारी प्रवीण पांडे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. मावळते पोलीस निरीक्षक किशोर साळे यांची पोलीस अधीक्षक कार्यालयात जिल्हा विशेष शाखेत बदली करण्यात आली आहे. •> पान २ वर

## वे|ध|क

### अपघातात स्कूटी जळून खाक

**नेरळ :** कल्याण-कर्जत राज्यमार्ग रस्त्यावर प्रवासी रिक्षा आणि ई-वाहन यांची धडक झाली. या अपघातात ई-वाहन असलेली स्कुटी जळून खाक झाली आहे. राज्यमार्ग रस्त्याच्या कर्जत दिशेकडील रस्त्याच्या मधोमध ती जळत होती. नेरळ विद्या मंदिर शाळा सोडल्यानंतर दामत गावाकडे जात असताना सोसल्य सोसायटीमधून एक प्रवासी रिक्षा कल्याण कर्जत रस्त्यावर येत होती. यावेळी नेरळ येथून दामत कल्याणकडे स्कुटी जात होती. तिची आणि प्रवासी रिक्षा यांची जोरदार धडक झाली आणि त्या अपघातानंतर स्कुटी काही अंतर घरंगळत पुढे गेली. त्याआधी स्कुटीवरून •> पान २ वर

### पाणीपुरवठ्यावर मर्यादा

**मुंबई :** अल निनोमुळे पावसाने ओढ दिल्याने आणि मुंबई महानगराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील पाणीसाठ्यात घट झाल्याने उपलब्ध पाणीसाठा अधिकाधिक काळ उपयोगात यावा यादृष्टीने खबरदारीचा उपाय म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेने विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. या अंतर्गत मुंबई महानगरात दि. १५ मेपासून १० टक्के पाणीकपात लागू करण्यात आली आहे. तसेच, पिण्याच्या पाण्याची बचत सुनिश्चित करण्यासाठी पिण्याव्यतिरिक्त इतर वापरावरही बुधवार, दिनांक १७ जून २०२६ पासून आवश्यक मर्यादा घालण्यात आल्या आहेत. त्यानुसार, सर्व बांधकामांसाठी दिलेल्या जलजोडण्या तात्पुरत्या खंडित करण्यात येणार आहेत.

# रायगडात पाणीसंकट




**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुरू होणाऱ्या पावसाने अद्याप पाठ फिरवल्यामुळे ऐन पावसाळ्यात रायगड जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट गडद झाले आहे. जिल्ह्यातील धरणांनी तळ गाठला असून, अनेक धरणे कोरडी पडली आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील लाखो नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. ९२ गावे, ३०३ वाड्या अशा एकूण ३९५ ठिकाणी असलेल्या दीड लाख नागरिकांना पाणीटंचाई फटका बसत असून, ७८ टँकरद्वारे त्यांची तहान भागविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.**

मार्च महिन्यापासून जिल्ह्यामध्ये पाणीटंचाईला सुरुवात झाली. सुरुवातीला अलिबाग व पेण तालुक्यातील गावांचा समावेश होता. त्यानंतर टंचाईग्रस्त गावांचा आकडा दिवसेंदिवस वाढू लागला. लघु पाटबंधारे विभागाच्या अखत्यारित येणारी धरणे तसेच जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अखत्यारित येणारे पाझर तलावांमधील जलसाठा कमी झाला. धरणांसह पाझर तलावांमधील पाणीसाठा अवघा १८ टक्केच शिल्लक आहे. काही धरणांमधील जलसाठा संपला असून, काही धरणांमध्ये जलसाठा संपण्याच्या वाटेवर आहे. धरणांनी तळ गाठल्याने मातीमिश्रीत पाणी येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर झाला आहे. गतवर्षी जून महिन्याच्या पंधरा दिवसांत धरणांसह शेते पाण्याने भरली होती. यंदा मात्र जून महिना संपण्याच्या मार्गावर असतानाही पाऊस अद्याप पडलेला नाही.

त्यामुळे पाणीसंकट गंभीर झाले आहे. जिल्ह्यातील ९२ गावे, ३०३ वाड्यांमध्ये पाण्याचा दुष्काळ निर्माण झाला आहे. एक लाख ५३ हजार १५७ नागरिकांना या टंचाईचा फटका बसत आहे. पाण्यासाठी वणवण •> पान २ वर

### शेतकरी हवालदिल

गतवर्षी पावसाने हजेरी लवकर लावली. त्यामुळे मे महिन्याच्या अखेरपासूनच पेरणीला सुरुवात झाली होती. त्यामुळे जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून भात लागवडीसाठी रोपे तयार झाली होती. काही ठिकाणी लावणीच्या कामांना सुरुवात झाली होती. यंदा पावसाने विलंब केला. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. भात बियाणांची पेरणी करण्यासाठी शेतकरी सज्ज झाला आहे. काही शेतकऱ्यांनी धूळवाफे पेरणी केली आहे. परंतु, पाऊस नसल्याने ते शेतकरीदेखील अडचणीत सापडले असल्याचे बोलले जात आहे.

### बांधावरील भाजीपाला संकटात

पाऊस पडेल या आशेवर राहून अनेक शेतकऱ्यांनी बांधावर भाजीपाला लागवड केली आहे. दुधी, भेंडी, चवळीसह अन्य भाजीपाला पिकांची लागवड करण्यात आली आहे. या पिकांना बोअरवेल आणि विहिरीमधील पाण्यामार्फत जगविण्याचे काम केले जात आहे. मात्र, विहिरीसह बोअरिंगदेखील कोरड्या पडण्याची भीती निर्माण झाली आहे. बांधावरील भाजीपाला पीक संकटात येण्याची चिंता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

> “जून महिना संपत आला, तरी पाऊस पडला नाही. पाण्याचा दुष्काळ निर्माण होत असताना भाजीपाला, भातपीक लागवड करताना अडचणी निर्माण झाल्या आहेत. पाऊस पेरणीयोग्य समाधानकारक पडत नाही, त्याचा फटका बसण्याची भीती आहे.”
> – सतीश म्हात्रे, शेतकरी

### जातवैधता प्रमाणपत्रासाठी

# कोळी महासंघाचा एल्गार

### मागण्या मान्य न झाल्यास राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

आदिवासी कोळी समाजातील कोळी महादेव, मल्हार कोळी, टोकरे कोळी, डोंगर कोळी आणि ढोर कोळी समाजबांधवांना जातीचे दाखले व जातवैधता प्रमाणपत्र सुलभरित्या मिळावेत, तसेच २० ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी कोळी महासंघातर्फे मंगळवारी अलिबाग येथील रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.



यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या आंदोलनकर्त्यांनी शासनाकडून बैठकीतील निर्णयांच्या अंमलबजावणीत होत असलेल्या दिरंगाईबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. आदिवासी कोळी समाजाच्या प्रलंबित प्रश्नांवर तात्काळ कार्यवाही करून संबंधित परिपत्रक जारी करावे, अशी मागणी करण्यात आली.

आंदोलनादरम्यान कोळी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाला स्पष्ट इशारा देत सांगितले की, येत्या पावसाळी अधिवेशनात समाजाच्या मागण्यांबाबत ठोस निर्णय न झाल्यास राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. समाजातील विद्यार्थ्यांना, युवकांना आणि नागरिकांना जातीचे दाखले व जातवैधता प्रमाणपत्र मिळविताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

आंदोलकांच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांची भेट घेऊन समाजाची भूमिका स्पष्ट केली तसेच विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. प्रशासनाने या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेऊन •> पान २ वर

### डॉक्टरच्या गाडीने तिघांना उडवले



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कळंबोली वसाहतीमधील मुख्य रस्त्यावरून आपल्या एसयुई गाडीने हॉस्पिटलमध्ये जात असताना सत्यम हॉस्पिटलचे मालक संजय बरनवाल यांनी तिघांना उडवत गंभीर जखमी केले आणि सुसाट गाडी रस्त्यावरील फुटपाथ चढून एका दातांच्या डॉक्टरांच्या दवाखान्याला जाऊन धडकली. हा अपघात सोमवारी सायंकाळच्या दरम्यान घडल्याने प्रचंड मोठा जमाव जमला. तात्काळ कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी घटनेचे गांभीर्य पाहून घटनास्थळी त्वरित आपल्या •> पान २ वर

# तरुणीचा खून करून तरुणाची आत्महत्या



- प्रेमसंबंधातून टोकाचे पाऊल?
- हत्याकांडाने रोहा तालुका हादरला

**। धाटाव । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील निडी गावात घडलेल्या दुहेरी मृत्यूच्या घटनेने संपूर्ण परिसर हादरला आहे. एका २० वर्षीय तरुणीचा गळा आवळून खून केल्यानंतर २७ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. प्राथमिक माहितीनुसार, दोघांमधील वादातून ही घटना घडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

मृत तरुणीचे नाव तन्वी गणेश ताडकर (२०) तर तरुणाचे नाव रोहित जनार्दन पाटील (२७) असे आहे. सोमवारी रात्री निडी येथील लक्ष्मण दुर्गाजी गडेकर यांच्या घरात दोघेही उपस्थित होते. यावेळी त्यांच्यात वाद झाल्यानंतर रोहितने तन्वीचा नायलॉनच्या दोरीने गळा आवळून खून केल्याचा आरोप आहे. त्यानंतर त्याने घरातील पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. मंगळवारी सकाळी ही घटना •> पान २ वर

# शेकापच्या प्रगती शिंगरुत बिनविरोध

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

कामार्ले ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदावर शेतकरी कामगार पक्षाने शिक्कामोर्तब केला आहे. मंगळवारी (दि.१६) उपसरपंचपदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. शेतकरी कामगार पक्षाच्या प्रगती सुभाष शिंगरुत यांचा एकमेव अर्ज या पदासाठी दाखल झाला होता. त्यामुळे ग्रामपंचायत अधिकारी सुवर्णा पाटील यांनी प्रगती शिंगरुत यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस •> पान २ वर

### कामार्ले ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी निवड




### शिंदे गटाला दणका

मागील महिन्यात रेवदंडा येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाच्या निवडणुकीत शेकापचे संतोष मोरे यांची बहुमतांनी निवड झाली होती. त्याचबरोबर मंगळवारी (दि. १६) कामार्ले ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाच्या निवडणुकीत शेकापच्या प्रगती शिंगरुत यांची बिनविरोध निवड झाली. रेवदंडापाठोपाठ कामार्लेमध्येही शिंदे गटाला जोरदार दणका मिळाला असून, या विजयाचा जल्लोष कार्यकर्त्यांनी उत्साहात साजरा केला.

### थेट कफ सिरप विक्रीवर बंदी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आता सर्दी-खोकला झाला म्हणून औषधांच्या दुकानात जाऊन थेट कफ सिरप विकत घेता येणार नाही. केंद्र सरकारने कफ सिरपच्या विक्रीबाबत अत्यंत कडक पाऊल उचलले आहे. यापुढे डॉक्टरांच्या लेखी चिठ्ठीशिवाय कोणत्याही औषध दुकानात कफ सिरप मिळणार नाही. मध्य प्रदेशात दूषित कफ सिरपमुळे २२ चिमुरड्यांचा मृत्यू झाल्यानंतर केंद्र सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे. केंद्रीय आरोग्य •> पान २ वर

### ऑलिव्ह रिडले समुद्र कासव संवर्धनाला प्रतिसाद । राज्यातील ५६ किनाऱ्यांवर लाखो घरट्यांची नोंद

# लाखो कासवाच्या पिल्लांना जीवदान



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**


शासनाच्या वन विभागांतर्गत कांदळवन कक्ष, कांदळवन प्रतिष्ठान आणि स्थानिक कासव मित्र यांच्या संयुक्त सहभागातून राबविण्यात येणाऱ्या ऑलिव्ह रिडले समुद्र कासव संवर्धन कार्यक्रमांतर्गत २०२५-२६ हंगामात राज्यातील ५६ समुद्रकिनाऱ्यांवर एकूण १ हजार ७२४ कासवांच्या घरट्यांची नोंद करण्यात आली. या घरट्यांमधील तब्बल १ लाख ०८ हजार ५९६ कासवांच्या पिल्लांना यशस्वीरित्या समुद्रात सोडण्यात आले असून, एकूण उबवण यशाचे प्रमाण ६१.२० टक्के नोंदविण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील किनारी जिल्ह्यांपैकी रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक ९६४ घरटी नोंदविण्यात आली असून, त्यामधून ५४ हजार २२७ पिल्लांना समुद्रात सोडण्यात आले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७३८ घरट्यांमधून ५३ हजार ३२५ पिल्लांना समुद्रात सोडण्यात आले असून, ६९.९५ टक्के इतके राज्यातील सर्वाधिक उबवण यशाचे प्रमाण नोंदविण्यात आले. रायगड जिल्ह्यात २२ घरट्यांमधून १ हजार ४४ पिल्लांना समुद्रात सोडण्यात आले.

यंदाच्या हंगामात रायगड जिल्ह्यातील आरावी, रत्नागिरी जिल्ह्यातील वेळणेश्वर, वरवडे, नेवरे, ढोकामळे, पूर्णगड, सालदुरे/पानंदे आणि कचरे तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दाभोळी आणि कोंडुरा या समुद्रकिनाऱ्यांवर प्रथमच कासवांची घरटी नोंदविण्यात आली. यावरून महाराष्ट्राची किनारपट्टी ऑलिव्ह रिडले समुद्र कासवांच्या प्रजननासाठी अजूनही महत्त्वपूर्ण अधिवास असल्याचे अधोरेखित होते.

सन २०१८ पासून कांदळवन कक्ष, कांदळवन प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या सहकार्याने मच्छिमारांसाठी नुकसानभरपाई योजना राबविण्यात येत आहे. •> पान २ वर

*सन २०११ पासून वाईल्डलाइफ कन्झर्व्हेशन अँड ॲनिमल वेल्फेअर असोसिएशन आणि महाराष्ट्र वन विभाग (डहाणू विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने डहाणू येथे समुद्री कासवांसाठी उपचार व पुनर्वसन केंद्र चालविण्यात येत आहे. तसेच कांदळवन कक्ष, महाराष्ट्र वन विभाग आणि कांदळवन प्रतिष्ठान यांच्या वतीने मुंबई व परिसरातील समुद्रकिनाऱ्यांवर आढळणाऱ्या जखमी कासवांच्या उपचारासाठी ऐरोली येथे कासव उपचार केंद्र उभारण्यात आले आहे. याशिवाय रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतही तात्पुरती उपचार केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.*




# मान्सूनची ओढ कायम; २० जूनपर्यंत पेरणी टाळा

## रोहा कृषी विभागाचा शेतकऱ्यांना सल्ला

**| चणेरा | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यात मान्सूनचा पाऊस अद्याप समाधानकारक न झाल्याने खरीप हंगामावर अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे. जूनचा दुसरा आठवडा संपत आला तरी अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकरी चिंतेत असून, पेरणी केलेल्या शेतांतील उगवणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने शेतकऱ्यांना २० जूनपर्यंत पेरणी न करण्याचा सल्ला दिला आहे.



तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी दिलेल्या माहितीनुसार, रोहा तालुक्यात सुमारे ७,१०० हेक्टर क्षेत्रावर भात, २५० हेक्टरवर नाचणी आणि ५ ते १० हेक्टरवर वरीची लागवड केली जाते. यंदा आतापर्यंत सुमारे ५० टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. जया, जोरदार, जोतिका आणि रुपाली या भात बियाण्यांची मोठ्या प्रमाणावर पेरणी करण्यात आली आहे. मात्र पेरणीनंतर पावसाने पाठ फिरवल्याने जमिनीतील ओलावा कमी होत असून, बियाण्यांच्या उगवणीवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता वाढली आहे.

कृषी विभागाच्या मते, भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार २० जूनपर्यंत कोरड्या हवामानाची स्थिती कायम राहू शकते. त्यानंतर पावसात वाढ होण्याची शक्यता असली तरी यंदाचे एकूण पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरणी न करता हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन निर्णय घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

वाशी गावातील शेतकरी जयवंत शिगवण यांनी सांगितले की, तीन दिवसांपूर्वी त्यांनी एक एकर क्षेत्रावर जोतिका भात बियाण्याची पेरणी केली आहे. आता सर्व शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत असून वेळेत पाऊस न झाल्यास दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते. एकदा पाऊस पडून पुन्हा खंड पडल्यास बियाण्यांची मोठ्या प्रमाणात नासाडी होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली.

पाऊस लांबल्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली असून कर्ज, वाढलेला शेती खर्च आणि अनिश्चित हवामान यामुळे बळीराजा हवालदिल झाला आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीसाठी तालुका कृषी कार्यालय किंवा ग्राम कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

पान १ वरून

## शेतकरी नुकसान भरपाईच्या प्रतीक्षेत

मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, नुकसान भरपाई मिळावी यासाठी संबंधित शेतकऱ्यांकडून उपकार्यकारी अभियंता महावितरण विभाग तळा यांच्याकडे अर्ज करून लागणाऱ्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली आहे. मात्र, या घटनेला सात महिन्यांचा कालावधी उलटून गेला असून, अद्याप दोन्ही शेतकऱ्यांना आपल्या मृत पावलेल्या बैलांची नुकसान भरपाई मिळालेली नाही.

याबाबत सर्व प्रकरणांचा प्रस्ताव वरती पाठवण्यात आला असून, वरून मदत आल्यानंतर ती सुपूर्द केली जाईल, असे महावितरण विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, सात महिन्यांचा कालावधी उलटूनही मदत मिळालेली नसल्याने आम्हाला मदत मिळणार तरी कधी, असा प्रश्न दोन्ही शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

## रायगडात पाणीसंकट

करण्याची वेळ या नागरिकांवर आली आहे.

जिल्हा प्रशासनाकडून या गावे व वाड्यांमधील नागरिकांसाठी ७८ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा सुरु केला आहे. परंतु, पाणी मुबलक मिळत नसल्याने पाण्याची समस्या भेडसावू लागली आहे. सर्वात जास्त पाणीटंचाई महाड, कर्जत, पेण, त्याखालोखाल पनवेल, माणगाव, म्हसळा, मुरूड, तळा, अलिबाग, पोलादपूर, रोहा, खालापूर, पोलादपूर या तालुक्यांमध्ये पाणीसमस्या निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील १५ तालुक्यांपैकी महाड तालुक्यातील १७ गावे, १११ वाड्यांमध्ये ११ टँकर्स, कर्जतमधील सात गावे, २२ वाड्यांमध्ये १४ टँकर्स. पेणमधील १३ गावे, ७८ वाड्यांमध्ये १२ टँकर्स या तालुक्यांमध्ये सर्वात जास्त पाणीटंचाई असल्याचे आकडेवारीनुसार स्पष्ट होत आहे. महाडमधील ३२ हजार, पेणमधील २७ हजार, म्हसळामधील १३ हजार, पनवेलमधील १८ हजार, कर्जतमधील १३ हजार ११२ नागरिकांना पाण्याची समस्या भेडसावत आहे. अलिबागमधील आठ हजार ७८२, उरणमधील चार हजार ५०५, खालापूरमधील आठ हजार ५८८, सुधागडमधील एक हजार ७६८, रोहामधील दोन हजार ५५६, माणगावमधील नऊ हजार २९७, पोलादपूरमधील सहा हजार ४५५ श्रीवर्धनमधील चार हजार ५६९, मुरूडमधील एक हजार ३९ आणि तळामधील ३७३ नागरिकांवर पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले आहे. पाऊसच पडत नसल्याने पाणीपुरवठा कसा उपलब्ध करायचा, असा प्रश्न प्रशासनासमोर उभा राहिला आहे.

## शेकापच्या प्रगती शिंगरुत बिनविरोध

सुरेश घरत यांच्यासह महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे गटातील शिवसेनेचे नेते कैलास गजने यांच्याकडून तसेच सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात आले. कामार्ले ग्रामपंचायतीच्या सदस्यपदाच्या नऊ आणि सरपंच एक अशा दहा जागांपैकी थेट सरपंच आणि सहा सदस्य अशा सात जागांवर शेकापसह महाविकास आघाडीची सत्ता आहे. उपसरपंच म्हणून शिंदे गटातील सूरज राजन गिरी यांच्याकडे जबाबदारी होती. मात्र, सदस्यांना विश्वासात न घेता ते कारभार चालवित होते. त्यामुळे त्यांच्याविरोधात सदस्यांनी अविश्वासाचा ठराव १८ मार्च २०२६ मध्ये केला होता. २० मार्च रोजी झालेल्या बैठकीत हा ठराव मंजूर करण्यात आला. त्यामुळे सूरज गिरी यांचे उपसरपंच पद रद्द झाले. रिक्त असलेल्या उपसरपंचपदासाठी निवडणूक घेण्यात आली. कामार्ले ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात मंगळवारी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ही निवडणूक घेण्यात आली.

शेकापच्या प्रगती सुभाष शिंगरुत यांचा उपसरपंचपदासाठी एकमेव अर्ज दाखल झाला. त्यामुळे उपसरपंच म्हणून त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे ग्रामपंचायत अधिकारी सुवर्णा पाटील यांनी जाहीर केले. प्रगती शिंगरुत यांची उपसरपंच म्हणून निवड झाल्यानंतर त्यांच्यावर अभिनंदनासह शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

या राजकीय घडामोडीत शिवसेनेचे नेते कैलास गजने यांचा मोलाचा वाटा ठरला आहे. शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांच्या हस्ते प्रगती शिंगरुत यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. यावेळी कैलास गजने, ग्रामपंचायत सदस्य अनिता पाटील, प्रगती पाटील, तुकाराम नाईक, गीता नाईक, ऋषीकेश नागावकर यांच्यासह दिपक गोंधळी, दिगंबर गिरी, रवींद्र गजने, आशिष गजने, परशुराम गजने, प्रणय पवार आदी शेकाप, शिवसेना महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. प्रगती शिंगरुत या शेतकरी कामगार पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्या असून, सलग चार वेळा सदस्य म्हणून त्या निवडून आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## थेट कफ सिरप विक्रीवर बंदी

मंत्रालयाने औषध नियमावलीतील 'शेड्यूल के'मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केली आहे. या अंतर्गत कफ सिरपला डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय विकण्याची असलेली सवलत आता पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. मात्र, खोकल्यासाठी वापरल्या जाणाऱ्या चघळण्याच्या गोळ्या किंवा टॅब्लेट्स पूर्वीप्रमाणेच डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय उपलब्ध राहतील. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये सरकारने यासंदर्भात मसुदा जारी करून हरकती मागवल्या होत्या, ज्यावर आता अंतिम शिक्कामोर्तब झाले आहे.

## लाखो कासवाच्या पिल्लांना जीवदान

या योजनेंतर्गत मासेमारी करताना मच्छिमारांच्या जाळ्यात अडकलेल्या समुद्री कासवांसह इतर संरक्षित समुद्री प्राण्यांना जाळे कापून जीवनदान देणाऱ्या मच्छिमारांना नुकसानभरपाई देण्यात येते. आतापर्यंत महाराष्ट्रात ४८६ समुद्री कासवांना वाचविण्यात मच्छिमार आणि वन विभागाला यश मिळाले असून, त्यासाठी मच्छिमारांना एकूण सुमारे ६१ लाख २१ हजार ८५० रुपयांची नुकसानभरपाई देण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे, समुद्री कासवे इजा किंवा संसर्गामुळे अनेकदा समुद्रकिनाऱ्यांवर जखमी अवस्थेत आढळतात. अशा कासवांची संख्या पावसाळ्यात अधिक प्रमाणात दिसून येते. जिवंत कासवं किनाऱ्यावर वाहून आल्यास त्यांना तातडीने उपचार मिळावेत यासाठी कांदळवन कक्षामार्फत 'मरीन रिस्पॉन्डंट गट' स्थापन करण्यात आला आहे. या गटात महाराष्ट्र वन विभागाचे कर्मचारी (वनपरिक्षेत्र अधिकारी), कांदळवन प्रतिष्ठानचे कर्मचारी, पशुवैद्यकीय डॉक्टर, स्वयंसेवी संस्थांचे सदस्य, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि प्राध्यापक यांचा समावेश आहे.

## प्रवीण पांडे नवे पोलीस निरीक्षक

मिळालेल्या माहितीनुसार, किशोर साळे यांनी यापूर्वी अलिबाग, मुरूड पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून काम पाहिले आहे. त्यानंतर त्यांची बदली लाचलुचपत प्रतिबंधक विभागात झाली. काही वर्षे या विभागात काम केल्यावर पोलीस निरीक्षक म्हणून रायगड पोलीस दलात पुन्हा बदली झाली. अलिबाग पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक म्हणून त्यांच्याकडे गेली दोन वर्षे धुरा होती. किशोर साळे यांची आता पोलीस अधीक्षक कार्यालयातील जिल्हा विशेष शाखेत बदली झाली आहे. नागपूर पोलीस दलातील वाहतूक विभागात कार्यरत असणारे प्रवीण पांडे यांची अलिबागचे पोलीस निरीक्षक म्हणून बदली झाली आहे. अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक म्हणून प्रवीण पांडे यांनी पदभार स्वीकारला. वाहतूक विभागाचा अनुभव असलेले प्रवीण पांडे अलिबाग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाहतूक कोंडी सोडविण्यासह हद्दीतील गैरधंद्यांवर अंकुश ठेवण्यास यशस्वी ठरतील का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## कोळी महासंघाचा एल्गार

लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. या आंदोलनात प्रा. अभय पाटील, ज्ञानेश्वर टिवळेकर, देवानंद घोगर, प्रवीण तांडेल, जयवंत अंबाजी, गोरक्षनाथ नवरीकर, सचिन चोरगे, पांडुरंग आरेकर, सूर्यकांत वाघमारे, सिद्धिका धसाडे, जलदीप तांडेल यांच्यासह कोळी महासंघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि आदिवासी कोळी समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## डॉक्टरच्या गाडीने तिघांना उडवले

सहकाऱ्यांसमवेत धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली.

संबंधित डॉक्टरला त्याच्या अपघाती गाडीसह ताब्यात घेऊन त्यांना कळंबोली पोलीस ठाण्यात घेऊन गेले. तर जखमींना उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. जखमींमध्ये दोन लहान पादचारी मुलांचा व एका इसमाचा समावेश आहे. कळंबोलीतील सत्यम हॉस्पिटलचे मालक डॉ. संजय बरनवाल हे आपल्या एसयुइ या ऑटोमॅटिक मोटर कारने कळंबोलीमध्ये आपल्या हॉस्पिटलमध्ये जात होते. सुधागड विद्या संकुलाच्या दिशेने ते आपल्या हॉस्पिटलकडे जात असताना भवानी दूध डेअरीच्या समोरील एका मोटारसायकला त्यांनी प्रथम उडवले.

त्यानंतर तीन मोटारसायकल उडवल्या. नंतर भांबावलेल्या डॉक्टरने अचानकपणे भरधाव गाडी उजव्या बाजूला वळवल्याने समोरील रस्त्यावरून चालणाऱ्या दोन लहान मुलांनाही जोरात ठोकर मारून उडवले. तसेच फुथपाथच्या बाजूला उभ्या असलेल्या एका स्कुटीला जोरदार धडक मारून स्कुटीचा पूर्ण चक्काचूर त्यांनी केला. त्यामध्ये स्कुटी चालक ही गंभीर जखमी झाला आहे. गाडीचा वेग थांबत नसल्याने गाडी रस्त्यावरून फुटपाथ वर चढली व फुटपाथवरून समोरील सुभाष मिश्रा यांच्या पिनाकी दातांच्या दवाखाना व विजय फोटो स्टुडिओच्या मधील पिलरला जाऊन धडकली. जर दातांच्या दवाखान्यात घुसली असती तर दवाखान्यामध्ये उभे असलेले पेशंट हे गंभीर जखमी झाले असते.

## तरुणीचा खून करून तरुणाची आत्महत्या

उघडकीस येताच गावात खळबळ उडाली. संबंधित घराचे मालक लक्ष्मण गडेकर यांचे निधन झाले असून, घराची देखभाल तन्वीच्या आईकडे असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. याप्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलिसांकडून विविध अंगांनी चौकशी केली जात आहे.

## अपघातात स्कूटी जळून खाक

प्रवास करणारे रस्त्याच्या बाजूला फेकले गेले होते. मात्र काहीही कळण्याच्या आत स्कुटीला आग लागली. रस्त्याच्या मधोमध असलेली स्कुटी आगीमध्ये काही क्षणातच भस्मसात झाली. दरम्यान, या अपघातात प्रवासी रिक्षाचे पुढे चाक हे वाहतूक करण्यायोग्य राहिलेले नाही.

तर प्रवासी रिक्षा एमएच ४६ ए झेड १२७७ या वाहनाला अन्य कोणतेही नुकसान झालेले नाही, तर स्कुटीवरून प्रवास करणाऱ्या दोघांवर नेरळ गावातील खासगी रुग्णालयात उपचार केले जात आहेत.



### जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते कि, आमचे अशील यांनी खालील वर्णन केलेली मिळकत कायम विकत घेण्याचे ठरविले असून खालील वर्णनाच्या मिळकतीची दिनांक १३/०८/२०२५ रोजी बयाणा पावती देखील केलेली आहे. आमचे अशील थोड्याच दिवसात खालील वर्णनाच्या मिळकतीचे खरेदीखत करणार आहेत. तरी खालील वर्णनाच्या मिळकतीच्या संबंधी कोणीही कोणताही व्यवहार करू नये. असे केल्यास संबंधित व्यक्ति विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल व होणाऱ्या नुकसानास ते स्वतः जबाबदार असतील.

**मौजे-खार दुतर्फा बोर्ली, ता. पेण, जि. रायगड.**

| स.न./हि.न. | भोगवटदाराचे नाव | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै |
|---|---|---|---|
| ६९/३ | लक्ष्मण रामदास पाटील | ०.१३-९० | ०१-९४ |

हि जाहीर नोटीस दि. १५/०६/२०२६ रोजीची.

**ॲडव्होकेट समीर चंदर बंगाली**
पत्ता :- मु. मांगरूळ, पोस्ट. कामार्ली,
ता. पेण, जि. रायगड,
मो.नं.८१४९०२९८११

### जाहीर समन्स/नोटीस
**अलिबाग येथील मे दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो यांचे न्यायालयात**
**दिवाणी चौकशी अर्ज क्र. ७७/२०२६**

श्री. अमित उत्तमराव अहिरे वगैरे — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर समन्स/नोटीसद्वारे आपणांस कळिवण्यात येते की, अर्जदार यांचे वडिल कै.उत्तमराव देवराम अहिरे यांचे दिनांक २४/०४/२०२५ रोजी मौजे पिंपळभाट, चेंढरे ता. अलिबाग येथील त्यांचे राहत्या घरी वयोमानपरत्वे निधन झाले आहे. कै.उत्तमराव देवराम अहिरे हे त्यांचे मृत्युपूर्वी मा. न्यायालयाचे स्थळसिमेत वास्तव्यास होते. तसेच अर्जदार यांची आई कै.सरला उत्तमराव अहिरे यांचे दिनांक ०१/०३/२०२६ रोजी मुंबई येथील 'हिंदुजा हॉस्पिटल' येथे उपचारादरम्यान निधन झाले आहे. कै. सरला उत्तमराव अहिरे हया त्यांचे मृत्युपूर्वी मा.न्यायालयाचे स्थळसिमेत मौजे पिंपळभाट, चेंढरे ता. अलिबाग येथे कायमस्वरूपी वास्तव्यास होत्या त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशिर वारस म्हणुन अर्जदार यांस (अ) मौजे चेंढरे, ता. अलिबाग येथील 'पी.एन.पी. नगर' या निवासी गृह संकुलातील तळमजल्यावरील वाणिज्य गाळा क्र.०५ क्षेत्र २६ चौ. मीटर (बिल्ट अप) ज्यास अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र. ALB000001813 (जुना मालमत्ता क्र. Z1PNP001825) (मॅन्युअल मालमत्ता क्र.१५४० ब 'ए' विंग) असे वर्णन आहे. आणि (ब)मौजे चेंढरे, ता अलिबाग येथील 'पी.एन.पी. नगर' या निवासी गृह संकुलातील तळमजल्यावरील वाणिज्य गाळा क्र. १८ क्षेत्र २२.९५ चौ.मीटर (बिल्टअप) ज्यास अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र ALB000001824 (जुना मालमत्ता क्र. Z1PNP001837) (मॅन्युअल मालमत्ता क्र १५४० ड 'ए' विंग) असे वर्णन आहे. या मिळकतीबाबत अर्जदार यांनी कै.उत्तमराव देवराम अहिरे व कै.सरला उत्तमराव अहिरे यांचे वारस म्हणून ठराव करून मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सबब, या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे नावे असा वारस दाखला देण्यास व जाहीर ठराव करणेस कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर आपले नेमलेले प्रतिनिधी वा वकिल यांचे मार्फत या दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर अलिबाग यांचे न्यायालयात दिनांक १८/०६/२०२६ रोजी हजर रहावे. आपण हजर न राहील्यास एकतर्फी काम चालेल, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख: १५/०६/२०२६

कोर्टाचा शिक्का

सही/-
**सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व स्तर अलिबाग**

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, माझ्या अशिलांकडून मला खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत मालमत्तेचा समावेश असलेल्या जमिनीसंदर्भात श्री. राजेंद्र सिंग शाह व श्री. राजेश रघुनाथ शाह यांचे हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

कोणीही व्यक्ती/घटक, यामध्ये व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंब (एचयूएफ), कंपन्या, बँका, वित्तीय संस्था, नॉन-बँकिंग वित्तीय संस्था, संस्था, मर्यादित दायित्व भागीदारी, व्यक्तींची संघटना वा व्यक्तींचे मंडळ, संस्थापित असो वा नसो, देणेकरी व/वा धनको व/वा प्राधिकारी यांसमवेत, परंतु त्यापर्यंत मर्यादित नसेल, यांचा मालमत्ता वा तिच्याकोणत्याही भागासंदर्भात विक्री, विनिमय, गहाण (समतुल्य वा अन्य), भार, भेट, न्यास, हस्तांतरण, उत्तराधिकार, देखभाल, अभिहस्तांकन, वहिवाट, ताबा, मृत्यूपश्चात वारसा, भागीदारी, संयुक्त उद्यम, विकास हक्क, मार्ग हक्क, ताबा, विचाराधीन विवाद, आरक्षण, भाडेकरार, उप-भाडेकरार, अनुज्ञप्ती, धारणाधिकार, प्रभार, हिस्सा, गहाण, सुविधाधिकार, देखभाल तत्वावर, ताबा, कुटुंब व्यवस्था/तडजोड वा अन्य व्यवस्था, जप्ती, निषेधाज्ञा वा कोणत्याही विधि न्यायालय, अर्धन्यायीक प्राधिकारी, न्यायाधिकरण, महसूल वा वैधानिक प्राधिकारी वा लवाद यांचा निवाडा, आदेश, निकाल वा हुकुमाद्वारे, जुना वहिवाट हक्क वा अग्रहक्क कोणत्याही सामंजस्य करारांतर्गत, कोणतेही कंत्राट/करार, विक्री करार, मुखत्यारपत्र, वाटपपत्र, पर्याय, एफएसआय उपभोग, टीडीआर/विकास संभाव्य हक्क, नकाराधिकार वा अन्य वासलाती, कर्जे, आगाऊ रकमा, कोणत्याहीवचनबद्धतेचे दायित्व वा अन्य कोणत्याही स्वरूपात किंवा अन्य कोणत्याही स्वरूपातील कोणत्याही कारणास्तव कोणताही लाभ, हक्क, दावे, हरकती, मागण्या, हिस्सा वा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंदर्भात लिखित स्वरूपात, सहाय्यक कागदोपत्री पुराव्यासहित पत्रव्यवहाराचा पत्ता - ॲड. मेघना शर्मा, ३२, ३ रा मजला, ऑनीक्स अपार्टमेंट, देसाई म नपा रुग्णालयाच्या मागे, गोविंद नगर, मालाड (पूर्व), मुंबई - ४०० ०९७ येथे व/वा इलेक्ट्रॉनिक मेलद्वारे adv.megharsharma@gmail.com येथे सदर दिनांकापासून १४ दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा अशा व्यक्तींचा असा कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध, हिस्सा, दावा, लाभ, पात्रता, हरकत व /वा मागणी काही असल्यास, ते अधित्यागित व/वा परित्यागित समजण्यात येतील.

**मालमत्तेची अनुसूची**

**पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड -** सर्व्हे क्रमांक २०, हिस्सा क्र.. ४, मोजमापित ०.४२.०० एच. आर. पी., गाव चिंधरन हद्दीतील, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :
उत्तरेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २०/२
दक्षिणेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २०/१७ व सर्व्हे क्र. २०/ १९
पूर्वेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २०/५, २०/६, २१ व २०/११
पश्चिमेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २०/२, २०/७, २०/१० व २०/९

**पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड** - सर्व्हे क्रमांक २०, हिस्सा क्र. ५, मोजमापित ०.०९.५० एच. आर. पी., गाव चिंधरन हद्दीतील, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :
उत्तरेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २०/३
दक्षिणेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २०/४
पूर्वेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २०/४
पश्चिमेस वा त्या दिशेस :सर्व्हे क्र. २०/६

**पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड** - सर्व्हे क्रमांक २०, हिस्सा क्र. ६, मोजमापित ०.०६.०० एच. आर. पी., गाव चिंधरन हद्दीतील, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :
उत्तरेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २०/३
दक्षिणेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २०/४ व २१
पूर्वेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २२/३
पश्चिमेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २०/५

**पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड** - सर्व्हे क्रमांक २०, हिस्सा क्र. ९, मोजमापित ०.३८.०० एच. आर. पी., गाव चिंधरन हद्दीतील, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :
उत्तरेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २०/७
दक्षिणेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २०/२२
पूर्वेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २०/१०, २०/४ व २०/१७
पश्चिमेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २०/८, २०/१३, २०/१६ व १९/१.

**पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड** - सर्व्हे क्रमांक २०, हिस्सा क्र. २२, मोजमापित ०.०४.६० एच. आर. पी., गाव चिंधरन हद्दीतील, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :
उत्तरेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. ३६/२
दक्षिणेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २०/९
पूर्वेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. २१
पश्चिमेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. १९/१

मुंबई
दि. १७ जून, २०२६

सही/-
**ॲड. मेघा शर्मा**
वकील
मोबा. नं. ९८३३०७४०९३

**मृद व जलसंधारण विभाग**
**कार्यकारी अभियंता**
**मृद व जलसंधारण विभाग, रायगड यांचे कार्यालय**
प्लॉट नं. २१५, पहिला मजला, विद्यानगर, चेंढरे- अलिबाग, जि.रायगड
email: dwcoraigad@gmail.com
**ई-निविदा सुचना क्र. ०२/ सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालाच्यावतीने कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, रायगड हे सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील योग्य त्या नोंदणीकृत सक्षम निविदाकाराकडून खालील कामाकरीता ई-निवीदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निवीदा मागवित आहोत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत.

सविस्तर निविदा सुचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळिवण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजीत एकुण किंमत रु. |
|---|---|---|
| १ | मौजे आदि व मौजे बरसगाव ता. महाड जि. रायगड येथे सिमेंट कॉंक्रिट बंधारा बांधणे | ४७,२७,२३१/- |
| २ | मौजे गोलदरा व मौजे पालचील ता.पोलादपूर जि. रायगड येथे सिमेंट कॉंक्रिट बंधारा बांधणे | ४०,४१,२८७/- |

निविदा उपलब्ध कालावधी- दिनांक १८/०६/२०२६ ते २५/०६/२०२६
निविदा उघडण्याचा दिनांक- २९/०६/२०२६
जा.क्र. जिजअ/मृवजवि/रायगड/लेशा/१११५/२०२६
दिनांक :- १५/०६/२०२६

सही/-
**कार्यकारी अभियंता,**
**मृद व जलसंधारण विभाग, रायगड**

**विमाका/कोवि/२०२६-२०२७/४०**

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे- वरंडे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, येथील पुढील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक १. सुजाता हरिश्चंद्र नाईक २. सारिका सुरेश घरत यांचेकडुन आमचे आशिलांनी जमिन मिळकत खरेदी घेणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन -:**

| गाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे. वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड | १२८ | क्षेत्र. ०-२३-८०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकुण ०-२५-३० | ५.५८ |

तरी वरील जमिन मिळकतीबद्दल कुणाचाही ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, बोजा अथवा लिज इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, इतर कोणाचाही कायदेशीर हक्क व हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची या नोटीसद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १७/०६/२०२६

सही
**ॲड. सौ.गौरी गिरीश म्हात्रे**
डी-२ हिराबाग मोदकम हॉटेलच्या वर
जिल्हा न्यायालयासमोर अलिबाग-रायगड
मो नं. ९२७१७७५२७७

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक महेश काशिनाथ ठाकूर यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|
| कोपर ता.अलिबाग | १५ | ०-२७-१०<br>पो.ख ०-०४-८०<br>एकुण क्षेत्र ०-३१-९० | ६.५० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी महेश काशिनाथ ठाकूर यांच्या हिश्यातील क्षेत्र ०-०७-१० हे.आर.,पो.ख.०-०४-८० हे. आर. एकुण क्षेत्र ०-११-९० हे. आर., आकार १.७० रू. पैसे ही मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

दिनांक :- १७-६-२०२६ सही/-
**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी आंबेघर), पो.पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीने कळिवण्यात येते की, खालील परिशीष्टात वर्णन केलेली मिळकत ही माझे अशिल श्रीमती. वासती क्रेग मोबर्ग आणि श्री. क्रेग बर्नाड मोबर्ग, रा. सदनिका क्र.४०१ क्लॉलीटास गार्डन सोसायटी, मौजे -कोप्रोली, ता.पनवेल हे खरेदीखताने मालकी हक्काने श्री.डेव्हीडसन टोपो आणि श्रीमती कल्पना रोझलिंग मिंज, रा.रा.सदनिका क्र.४०२, क्लॉलीटास गार्डन सोसायटी, मौजे कोप्रोली, ता. पनवेल यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचा विचार करीत आहेत.

**वरीलप्रमाणे परिशिष्ट**

सदनिका क्र.४०२, चौथा माळा, बि विंग, क्लॉलीटास गार्डन सोसायटी, सर्व्हे नं. १६/२अ, १६/२क, १६/३अ, मौजे-कोप्रोली, ता.पनवेल, जि.रायगड

तरी सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील परिशीष्टातील वर्णन केलेल्या मिळकतीमधील हक्क, हितसंबंध व अधिकार आणि/किंवा इतर फायदे याबाबत ज्या कुणाची समझोता करार, साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, चार्ज, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ, वाहिवाट, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन किंवा इतर बाबींद्वारें हरकत तक्रार दावा हितसंबंध असेल तर त्यांनी तशा प्रकारची हरकत तक्रार दावा, हितसंबंध ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील सही करणार यांच्या खालील पत्त्यावर १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह सादर करावी वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार दावा वैगरे न आल्यास वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती या निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार दावा, हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार दावा माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दि.१५/०६/२०२६

KISHOR A. DHAKAD
Advocate High Court
Advocate En Roll No. MAH/1913/2006
Office Add Office 0.21, First Floor,
Municial Complex, Vasudev Balvar
Phadke Natyagruha, panvel 410206. Raigad

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग




मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# नेरळ ग्रामपंचायत निवडणूकीची धुमधाम

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायतीचे आरक्षण सोडत काढण्यात आली आहे. येथील सदस्य मंडळाची मुदत संपून दोन वर्षांचा कालावधी लोटला असून, आरक्षणाची सोडत काढण्यात आल्याने इच्छुकांची भाऊगर्दी दिसून येत आहे. आरक्षणाच्या सोडतीमुळे जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती निवडणुकीत वरचढ ठरलेल्या कर्जत परिवर्तन आघाडीने पुन्हा आघाडी घेण्याच्या इराद्याने हालचाली करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, महायुतीतील पक्षांकडून सध्या सावध पावले टाकली जात असून, निवडणूक चुरशीची होणार हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

रायगड जिल्ह्यातील नेरळ ही ग्रामपंचायत लोकसंख्येने सर्वात मोठी ग्रामपचांयत आहे. सर ग्रामपंचायतीमध्ये सार्वत्रिक निवडणुकीची धुमधाम सुरू झाली आहे. पंचायतीतील १७ जागांचे

- **आरक्षणामुळे अनेकांच्या मनसुब्यावर पाणी ?**
- **थेट सरपंचपद महिलांसाठी राखीव**

आरक्षण जाहीर झाल्याने इच्छुक उमेदवारांचे इरादे स्पष्ट होऊ लागले आहेत. यावेळी नेरळ ग्रामपंचायतीतील थेट सरपंच नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी राखीव असल्याने माजी सदस्य इच्छुक होण्याची शक्यता आहे. मात्र, सदस्यपदांचे आरक्षण हे अनेक मावळत्या सदस्यांना अन्य ठिकाणी प्रभाग शोधण्याची वेळ आणणारे आहेत. आदिवासी समाजाचे सर्वाधिक मतदार असलेल्या प्रभाग एकमध्ये दोन जागांवर अन्य समाजातील उमेदवार किंवा आदिवासी




समाजातील उमेदवार निवडून येऊ शकतो. प्रभाग दोन मधील तिन्ही जागा सर्वसाधारण झाल्याने तेथे सर्वाधिक उड्या पडण्याची शक्यता आहे. तसेच, अन्य प्रभागातील इच्छुकांची गर्दी देखील प्रभाग दोनमध्ये होण्याची देखील शक्यता नाकारता येत नाही. प्रभाग तीनमध्ये पहिल्यांदाच स्थानिकांच्या हिताचे आरक्षण झाल्याचे दिसून येत आहे. तर, प्रभाग चारमध्ये यावेळी तीन ऐवजी दोनच जागा असल्याने येथे एका सर्वसाधारण जागेवर अनेकांना स्वप्न पडू लागली आहेत. मात्र, कर्जत पंचायत समितीचे सदस्य भगवान चंचे यांचा घरचा वॉर्ड असल्याने परिवर्तन आघाडीचे वजन दिसून येत आहे. प्रभाग पाचमधील विद्यमान महिला सदस्यांना सर्वसाधारण जागा राहिली नसल्याने दुसऱ्या प्रभागात जाऊन निवडणूक लढवावी लागू शकते. या प्रभागातील तिन्ही जागा आरक्षित असल्याने सर्वसाधारण गटातील इच्छुक कदाचित या आरक्षणाला हरकत घेऊ शकतात. मात्र, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती मधील आरक्षणावर फारसा बदल होण्याची शक्यता कमी आहे. प्रभाग सहामध्ये देखील एका विद्यमान सदस्याला अन्य ठिकाणी जाऊन निवडणूक लढवावी लागू शकते. तर, यावेळी अनुसूचित जमातीमधील तीन जागा आदिवासी बहुल भागापेक्षा अन्य भागातील प्रभागातही आरक्षण जाहीर झाल्याने यावेळी तीन आदिवासी आरक्षित जागांशिवाय आणखी आदिवासी उमेदवार ग्रामपंचायत निवडणुकीत विजयी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

यावेळी नेरळ ग्रामपंचायत निवडणुकीत राजकीय पक्षांचे प्रमुख पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात येऊ शकतात. त्यात शेकाप शहर चिटणीस प्रभाग दोन, मनसे शहर अध्यक्ष प्रभाग दोन, शिवसेना शिंदे गट तालुका उप प्रमुख प्रभाग दोन आणि आझाद हिंद पार्टी देखील प्रभाग दोनमधून, तर युवासेनेचे पदाधिकारी प्रभाग दोन आणि सहामधून निवडणूक लढविण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तसेच, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहर अध्यक्ष आणि शिवसेना ठाकरे गटाचे शहर प्रमुख प्रभाग पाचमधून, शिवसेना शिंदे गट शहर प्रमुख अन्य एका प्रभागातून, तर याशिवाय काही माजी सदस्य पुन्हा लढण्यासाठी तयारीला लागले आहेत. तसेच, भाजप मंडळ महिला अध्यक्ष थेट सरपंचपदासाठी लढत देणार असल्याचेही बोलले जात आहे.

यावेळी सर्वसाधारण जागा दहा असून, त्यातील चार जागा महिलांसाठी राखीव आहेत. त्यामुळे त्या सर्वसाधारण जागांवर बहुसंख्य उमेदवारांचे डोळे लागून राहिले आहेत. अशावेळी राजकीय पक्ष घराणेशाही कायम ठेवतात की मोडून काढून कार्यकर्त्यांना संधी देतात? याकडे देखील सर्वसामान्य कार्यकर्ते यांचे विशेष लक्ष असणार आहे.

## विवेकानंद पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थी गुणगौरव सोहळा

| पनवेल | प्रतिनिधी |

शेतकरी कामगार पक्षाचे नेते, माजी आमदार विवेकानंद पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शेकाप व मा.आ. दत्तूशेठ पाटील शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने शुक्रवारी (दि.१९) दहावी व बारावीच्या परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा पनवेल येथील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सकाळी १०.०० वाजता पार पडणार आहे, अशी माहिती शेकाप नेते मा.आ. बाळाराम पाटील यांनी दिली.

या विद्यार्थी गुणगौळण गौरव सोहळ्यामध्ये प्रख्यात वक्ते अच्युत गोडबोले यांचे दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ''आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि उद्याचे जग'' या विषयावर महत्त्वाचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तसेच, मा.आ. विवेकानंद पाटील यांच्या ७२व्या वाढदिवसानिमित्त ७२ हजार आयुष्यमान भारत कार्ड काढण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या सोहळ्यामध्ये पनवेल, कळंबोली, कामोठे, खारघर, तळोजा आणि ग्रामीण भागातील जिल्हा परिषद मतदार संघातून, तसेच उरण मतदार संघातून दहावी आणि बारावी उत्तीर्ण झालेल्या पहिल्या तीन विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा करण्याचे आयोजन करण्यात आले आहे. या गुणगौरव सोहळ्याच्या कमिटीमध्ये मा.आ. बाळाराम पाटील, पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती आणि पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, पनवेल कृउबा समितीचे सभापती नारायण घरत, संचालक देवेंद्र मढवी, तालुका चिटणीस राजेश केणी, पनवेल महानगरपालिका चिटणीस तथा स्वीकृत नगरसेवक प्रकाश म्हात्रे, शेकाप कार्यालयीन चिटणीस विलास फडके, माजी आमदार दत्तूशेठ पाटील, शिक्षण संस्थेचे सीईओ रा.गो. पाटील आदींचा समावेश करण्यात आला आहे.

## निवडक

### आंबोलीमध्ये अंगणवाडीची तोडफोड

**मुरुड-जंजिरा :** मुरुड तालुक्यातील आंबोली गावात लहान मुलांना शिकण्यासाठी अंगणवाडी इमारत आहे. या ठिकाणी गावातील लहान मुले आपले प्राथमिक शिक्षण घेत असतात. परंतु, उंडर गावातील दोन तरुणांनी रात्रीच्या वेळी या अंगणवाडीची तोडफोड केली आहे. निकेतन नारायण सातमकर (२१) व प्रणय प्रमोद गुंड (२१) असे तोडफोड करणाऱ्यांचे नाव असून, त्यांनी अंगणवाडीतील हॉल मधील दोन खिडक्या, स्टोअर रूम व स्वयंपाक घरातील एक-एक खिडक्यांच्या काचा फोडल्या आहेत. तसेच, अंगणवाडीतील सामानाचीही तोडफोड करून अंगणवाडीचे मोठे नुकसान केले आहे. याबाबतअंगणवाडी सेविका इंदिरा ठाकूर यांनी मुरुड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीची दखल पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी घेऊन या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नावे वगळण्याचा डाव फसला

**उरण :** उरण विधानसभा मतदारसंघातील शेवा-हनुमान कोळीवाडा परिसरातील मीरा रामकिसन परदेशी कुटुंबाच्या १६ मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्याच्या प्रयत्नाला अखेर प्रशासनाने नकार दिला आहे. शेवा कोळीवाडा सामाजिक ग्रामविकास मंडळाचे उपाध्यक्ष मंगेश अनंत कोळी यांनी दाखल केलेला अर्ज मतदार नोंदणी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) आविशकुमार सोनोने यांनी फेटाळून लावत सर्व संबंधित मतदारांची नावे मतदार यादीत कायम ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात मीरा रामकिसन परदेशी कुटुंबाच्या मतदारांची नावे वगळण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार मतदान केंद्रस्तरीय अधिकारी मांगी कोळी यांच्यामार्फत प्रत्यक्ष स्थळ पडताळणी करण्यात आली. पडताळणीदरम्यान संबंधित मतदार हे नमूद पत्त्यावर वास्तव्यास असल्याचे आढळून आले. तसेच, त्यांची नावे याच मतदारसंघात कायम ठेवावीत, असा अहवाल बीएलओ यांनी सादर केला होता. या प्रकरणी दि.२ जून व ३ जून रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीदरम्यान संबंधित मतदार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून आपली बाजू मांडली. त्यांनी आधारकार्डसह इतर कागदपत्रे सादर करत आपण उरण विधानसभा मतदारसंघाच्या हद्दीतच वास्तव्यास असल्याचे स्पष्ट केले.

### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत



**श्रीवर्धन :** विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षात शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या सामाजिक बांधिलकीतून महाराष्ट्रीय यादव चॅरिटी ट्रस्ट श्रीवर्धन शाखेच्यावतीने बोर्लीपंचतन विभागातील विविध गावांमध्ये वह्यांचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम शुक्रवारी (दि.१२)अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. यावेळी वावेपंचतन, नागलोळी-नवीवाडी, खुजारे, वेळास आणि वांजळे या गावांमधील समाज बांधवांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना हे शैक्षणिक साहित्य सुपूर्द करण्यात आले. ट्रस्टच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या सेवाभावी उपक्रमा प्रसंगी ट्रस्टचे विश्वस्त प्रकाश रिकामे, माजी विश्वस्त सुरेश तांबडे, कार्याध्यक्ष मोहन लाड, सचिव लिलाधर रिकामे, खजिनदार दिलीप खेडेकर आणि ज्येष्ठ सल्लागार नथूराम महाडिक प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच उदय रिकामे, संतोष मिरगळ, मिलन काते, आत्माराम महाडिक, शरद खेडेकर, नेहा महाडिक, अरुण वाजे आणि दर्गे यांच्यासह अनेक समाज बांधवांनी कार्यक्रमाला हजेरी लावली.

### उपजिल्हा रुग्णालय हस्तांतरणाची मागणी

**पनवेल :** शहरातील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात यावे, अशी मागणी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात त्यांनी, उपजिल्हा रुग्णालयात अनेक मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. रुग्णालयात पुरेशा प्रमाणात औषधांचा तुटवडा, डॉक्टरांची अपुरी संख्या, सफाई कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे निर्माण होणारे स्वच्छतेचे प्रश्न, तसेच आवश्यक वैद्यकीय उपकरणांच्या अभावामुळे रुग्णांवर प्रभावी उपचार करण्यात अडचणी येत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. पालिका क्षेत्रातील मोठ्या प्रमाणातील नागरिक या रुग्णालयावर उपचारासाठी अवलंबून असल्याने रुग्णालयाचे व्यवस्थापन महानगरपालिकेकडे दिल्यास अधिक आधुनिक सुविधा उपलब्ध करून देता येतील, असा दावा त्यांनी केला आहे. तसेच, महानगरपालिकेच्या माध्यमातून रुग्णालयाचा सर्वांगीण विकास करून नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा देणे शक्य होईल, असेही निवेदनात म्हटले आहे.

## श्रीवर्धनमध्ये रिक्षा वाहतुकीचा बोजवारा

### आरटीओ, स्थानिक प्रशासन सुस्त

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन शहरात गेल्या काही वर्षांत पर्यटनाचा आलेख कमालीचा उंचावला आहे. मात्र, पर्यटनाच्या या झगमगाटात शहराची अंतर्गत वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून, तिला अवैध आणि मनमानी कारभाराचे ग्रहण लागले आहे. श्रीवर्धनमधील रिक्षा वाहतुकीचा पार बोजवारा उडाला असून, प्रादेशिक परिवहन विभाग आणि स्थानिक पोलीस प्रशासन या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा आरोप आता जाहीरपणे होऊ लागला आहे.

श्रीवर्धन शहरात धावणाऱ्या अनेक रिक्षांकडे आवश्यक कागदपत्रे, वैध परवाने आणि वाहनाची फिटनेस तपासणी केलेली नाही, अशी चर्चा आहे. नियमांनुसार रिक्षात ठरावीक प्रवासी बसवणे बंधनकारक असताना, अनेक चालक केवळ आर्थिक फायद्यासाठी क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी कोंबून वाहतूक करत आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पर्यटन हंगामात विकेंडला शहरात येणाऱ्या वाहनांची संख्या मोठी असते. अशातच, काही बेशिस्त रिक्षा चालकांकडून गर्दीच्या ठिकाणी मनमानी पद्धतीने रस्त्याच्या मधोमध किंवा कडेला रिक्षा पार्क केल्या जातात. त्यामुळे पादचाऱ्यांना चालणे असह्य झाले असून, तासन् तास वाहतूक कोंडी होत आहे. त्यातच, स्थानिक प्रवाशांना डावलून पर्यटकांकडून अव्वाच्या सव्वा भाडे उकळण्याचे प्रकारही वाढले असून, श्रीवर्धनच्या पर्यटन नगरीच्या प्रतिमेला मोठा तडा जात आहे. श्रीवर्धनमध्ये ज्या दिवशी आरटीओ अधिकाऱ्यांचा कॅम्प असतो त्या दिवशी रिक्षा हेतुपुरस्सर बंद ठेवल्या जातात. हा लपंडाव गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असून, आरटीओच्या मोहिमेची आगाऊ माहिती या अवैध चालकांपर्यंत पोहोचते कशी? की हा केवळ एक फार्स आहे? अशी शंका आता नागरिकांमधून उपस्थित केली जात आहे.

## फुटणाऱ्या पाईपलाईनमुळे श्रीवर्धनकर हैराण

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

दिवसेंदिवस वाढते शहरीकरण, लोकसंख्येचा विस्फोट आणि उन्हाळ्यात होणारी पर्यटकांची अभूतपूर्व गर्दी यामुळे श्रीवर्धन शहराची तहान भागवणारे रानवली धरण आता पुरते दमले आहे. सुमारे ३५ ते ४० वर्षे जुन्या झालेल्या या एकाच धरणावर सध्या संपूर्ण शहराचा भार आहे. त्यातच रोज फुटणारी मुख्य पाईपलाईन आणि धरणाची वयोमर्यादा यामुळे श्रीवर्धनच्या पाणीपुरवठा व्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत.

निसर्गरम्य समुद्रकिनाऱ्यामुळे श्रीवर्धन हे पर्यटकांचे आवडते केंद्र बनले आहे. मात्र, या वाढत्या पर्यटनाचा थेट आणि प्रचंड ताण शहराच्या पाणीपुरवठ्यावर पडत आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये येथील हॉटेल्स, होमस्टे आणि रिसॉर्ट्स पर्यटकांनी हाऊसफुल्ल असतात, त्यामुळे पाण्याची दैनंदिन मागणी अचानक दुप्पट-तिप्पट होते. दुसरीकडे, शहरात वेगाने वाढणारे गृहप्रकल्प आणि वाढती स्थानिक लोकसंख्या यामुळे मे आणि जून महिन्यांत रानवली धरणातील पाणीसाठा कमालीचा खालावतो. सद्यस्थितीत शहराला एक दिवसाआड पाणीपुरवठा करावा लागत असल्याने नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. सध्या नगरपरिषद आणि संबंधित जलसंपदा विभागाकडून केवळ तात्पुरत्या मलमपट्ट्या केल्या जात आहेत. रोज पाईपलाईन फुटली की ती जोडणे, एवढ्यापुरतेच प्रशासनाचे काम मर्यादित राहिले आहे. श्रीवर्धनच्या भौगोलिक रचनेचा सखोल अभ्यास करून नवीन धरण किंवा मोठा जलसाठा उभारण्यासाठी ठोस व दूरगामी पावले अद्याप उचलली गेलेली नाहीत. या गंभीर समस्येकडे लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागाने वेळीच लक्ष दिले नाही, तर आगामी काळात श्रीवर्धनमध्ये पाण्याचे भीषण युद्ध सुरू होईल, अशी चिन्हे दिसत आहेत.

## कामगारांना न्याय देण्याची मागणी

| पनवेल | प्रतिनिधी |

नवी मुंबईतील सर्व रेल्वे स्थानके सिडकोकडून मध्य रेल्वेकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून या स्थानकांवर कार्यरत असलेल्या सुमारे ३५० कंत्राटी सफाई कामगारांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या कामगारांनाही स्थानकांसह मध्य रेल्वेकडे हस्तांतरित करण्यात यावे, अशी मागणी आझाद कामगार संघटनेने खासदार सुरेश म्हात्रे यांच्याकडे निवेदनाद्वारे मांडली.

संघटनेचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांनी कामगारांची सद्यस्थिती, त्यांच्या सेवाकाळाची माहिती तसेच संबंधित कायदेशीर बाबी खासदारांना सविस्तरपणे समजावून सांगितल्या. अनेक वर्षांपासून रेल्वे स्थानकांच्या स्वच्छतेची जबाबदारी सांभाळणाऱ्या कामगारांना हस्तांतरण प्रक्रियेत वगळण्यात येऊ नये, अशी भूमिका त्यांनी मांडली. खासदार म्हात्रे यांनी निवेदन स्वीकारून कामगारांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती संघटनेतर्फे देण्यात आली. यावेळी शेकापचे गटनेते नगरसेवक केतन भगत, अनंता म्हात्रे, बंटी पाटील, कामगार प्रतिनिधी नंदा कोळी, गीतेश गायकवाड, राकेश बारगोडे, शांताराम म्हात्रे, संदीप कोळी आणि अनिकेत भंडारे आदी उपस्थित होते.

## माथेरान नगरपरिषदेला पत्रकारांचे वावडे

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक होऊन सहा महिन्यांचा कालावधी लोटला आहे. या कालावधीत सहा सर्वसाधारण सभा होण्याऐवजी दुसरी सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली. या सभेपुढे ३८ विषय ठेवण्यात आले होते आणि सभेमध्ये होणारी वादळी चर्चा लक्षात घेऊन मुख्याधिकारी यांच्याकडून प्रसार माध्यमांना बसण्यास हरकत घेण्यात आली. दरम्यान, नगरपरिषदेला पत्रकारांचे वावडे असल्याचे आणि आपले कारनामे माध्यमांमधून बाहेर येऊ नये म्हणून पत्रकारांना सभेला बसू दिले नाही, असे स्थानिक पत्रकारांमधून



बोलले जात आहे.

माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक डिसेंबर महिन्यात झाली. त्यानंतर दर महिन्याला एक याप्रमाणे सहा सर्वसाधारण सभा होणे अपेक्षित होते. मात्र, नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडलेली सर्वसाधारण सभा नवीन सदस्य मंडळाची दुसरीच सर्वसाधारण सभा आहे. या सर्वसाधारण सभेच्या अजेंडामध्ये एकूण ३८ विषय ठेवण्यात आले आणि त्या विषयांवर होणारी चर्चा लांबली. सव्वाअकरा वाजता सुरु झालेल्या सभेची सुरुवात मागील सभेचे इतिवृत्त वाचन करून झाली. मात्र, ते इतिवृत्त वाचन केले जात असताना बहुसंख्य सदस्यांनी आक्षेप घेतल्याने अजेंडा वरील पहिलाच विषय सुरु होण्यास दुपार संपली होती. हि सभा शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाची असल्याने माथेरान आणि कर्जत तालुक्यातील पत्रकार हे सकाळी साडेदहा वाजता परिषदेच्या कार्यालयाबाहेर जमले होते. मात्र, प्रत्यक्ष सभा सुरु होत असताना वाहिन्या आणि वृतपत्रांच्या प्रतिनिधींना संकलन करून देण्यास मज्जाव करण्यात आला. दरम्यान, माथेरान पालिकेमध्ये रात्री ८.०० वाजले तरी सर्वसाधारण सभा सुरु असल्याने पालिकेच्या कामाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

## नागोठणे पोलिसांची धडक कारवाई

### वाघ्रणवाडी जंगलातील हातभट्टी उद्‌ध्वस्त

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस पथकाने रविवारी (दि.१४) सकाळी आणखी एक मोठी कारवाई केली. या कारवाईत नागोठण्याजवळील वाघ्रणवाडी आदिवासी वाडीच्या जंगल परिसरातील एक मोठी हातभट्टी उद्‌ध्वस्त करण्यात आली. यावेळी ८ प्लास्टिकच्या बॅरलमध्ये प्रत्येकी २०० लिटर असे एकूण १६०० लिटर गुळमिश्रित रसायन सापडले. गेल्या काही दिवसांतील ही मोठी धाड असलेल्या या गुळमिश्रित रसायनाची किंमत ५० रुपये प्रति


(छायाचित्र: महेश पवार)

लिटर दराने ८ हजार रुपये अशी आहे. तसेच, रबराच्या ७ ट्यूब मध्ये प्रत्येकी २० लिटर दारूची किंमत प्रति लिटर रुपये १०० याप्रमाणे तयार दारूची किंमत १४ हजार रुपये असा एकूण २२ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केल्याची माहिती सापोनि सचिन कुलकर्णी यांनी दिली. दरम्यान, आठ प्लास्टिक बॅरल मधील गुळमिश्रित रसायन हे वाहतुकीस अवघड असल्याने ते जागीच नष्ट करण्यात आले आहे. याप्रकरणी नागोठणे पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, वाघ्रणवाडी येथील उत्तम शिद या फरार आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत.

## गावकऱ्यांकडून मगरींना जीवदान

| महाड | प्रतिनिधी |

जिल्ह्यातील नाते, कोथुर्डे गावाच्या हद्दीत गेले पंधरा दिवस सातत्याने मगरी मानवी वसतीतील रस्त्यावर चालताना निदर्शनास येत आहेत. महाडमधील सिस्केप संस्था, सदस्य आणि वनविभाग यांच्या यशस्वी प्रयत्नाने या मगरींना सुखरूप त्यांच्या परिस्थितीकी वातावरणात सोडले जात आहे. आता मगर दिसताच थेट गावकरी सिस्केप सदस्यांना संपर्क साधत मगरीचे संरक्षण करताना दिसत आहेत. त्यामुळे प्रसार माध्यमांच्या सहकार्याने या कामी गावोगावी मगर या प्राण्याबद्दल भीती व गैरसमज दूर झाल्याचे दिसत आहे.

## पाईपलाईनच्या कामामुळे नागरिक त्रस्त

| पनवेल | प्रतिनिधी |

नवीन पनवेल परिसरात गॅस पाईपलाईन टाकण्याच्या कामासाठी रस्त्यावर खोदलेले खड्डे गेल्या आठ दिवसांपासून तसेच ठेवण्यात आले आहेत. खोदलेल्या खड्ड्यांमध्ये खडी टाकण्यात आली असली तरी त्यावर अद्याप डांबरीकरण करण्यात आलेले नाही. त्यामुळे ही खडी संपूर्ण रस्त्यावर पसरली असून, वाहनचालकांसाठी मोठा धोका निर्माण झाला आहे. वाहनांच्या टायरखाली येणारी खडी वेगाने आजूबाजूला उडत असल्याने अनेक नागरिकांना किरकोळ दुखापती झाल्या आहेत. तसेच, काही वाहनांच्या काचाही फुटल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे



या रस्त्यावरील काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे. या कामामध्ये डांबर उपलब्ध नाही, अशी माहिती मिळत आहे. मात्र, काम पूर्ण होईपर्यंत नागरिकांच्या वाहनांचे होणारे नुकसान व अपघातांची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात असून, प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

**पत्रकार प्रशिक्षण केंद्राचे यशस्वी आयोजन | दिलीप ठाकूर यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन**

## चित्रपट पत्रकारितेचा इतिहास विद्यार्थ्यांसमोर

| अलिबाग | प्रतिनिधी |

ज्येष्ठ चित्रपट पत्रकार, लेखक आणि टीव्ही विश्लेषक दिलीप ठाकूर यांनी स्वयं शैक्षणिक संस्थेच्या पत्रकार प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी चित्रपटसृष्टीतील चार दशकांहून अधिक काळाचा समृद्ध अनुभव, हजारो कलाकार-तंत्रज्ञांशी साधलेला थेट संवाद, पडद्यामागील असंख्य आठवणी, चित्रपट पत्रकारितेतील संघर्ष, सातत्य आणि यशाचा प्रवास यांची जिवंत अनुभूती विद्यार्थ्यांना दिली.

पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेल्या विद्यार्थ्यांना चित्रपट पत्रकारितेची सखोल माहिती



मिळावी, या उद्देशाने पत्रकार प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षण प्रमुख ओमकार नागावकर यांनी दिलीप ठाकूर यांना विशेष निमंत्रण दिले होते. अलिबाग येथील शासकीय विश्रामगृहात रविवारी (दि.१४) झालेल्या या विशेष संवाद आणि मार्गदर्शन कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी दिलीप ठाकूर यांनी, नवशक्ती दैनिकातील सुरुवातीच्या दिवसांपासून ते मुद्रित माध्यम, वृत्तवाहिन्या आणि डिजिटल माध्यमांपर्यंतचा प्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला. चित्रपट पत्रकारिता म्हणजे केवळ कलाकारांच्या मुलाखती किंवा चित्रपट परीक्षण नसून, त्यामागे सातत्यपूर्ण अभ्यास, संशोधन, निरीक्षणशक्ती, विश्वासार्ह स्रोत आणि प्रचंड मेहनत आवश्यक असते, असे त्यांनी स्पष्ट केले. ''चित्रपट कसा तयार होतो, त्याचे समीक्षण कसे करावे, मनोरंजन पत्रकारितेतील नैतिक मूल्ये कोणती, ग्रामीण भागातील पत्रकारांनी या क्षेत्रात काम करताना कोणती काळजी घ्यावी,'' यासह अनेक विषयांवर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. पडद्यावरील कलाकार आणि पडद्यामागील कलाकार यांच्यातील वास्तव, चित्रपट निर्मितीची प्रक्रिया, चित्रपट वितरण आणि प्रदर्शन व्यवस्थेतील बदल याबाबतही त्यांनी माहिती दिली. यावेळी २६ वर्षांपूर्वीची आणि त्यानंतरची बदललेली चित्रपटसृष्टी, सिंगल स्क्रीन थिएटरपासून मल्टिप्लेक्स संस्कृतीपर्यंतचा प्रवास, तसेच 'शोले' ते 'धुरंधर' या कालखंडातील चित्रपटांचा बदलता चेहरा यावर त्यांनी अत्यंत रंजक शैलीत भाष्य केले.

या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी चित्रपट, पत्रकारिता, लेखन, समीक्षण आणि मनोरंजन क्षेत्रातील करिअरविषयी विविध प्रश्न विचारले. दिलीप ठाकूर यांनी आपल्या खास शैलीत, उदाहरणांसह आणि अनेक आठवणी सांगत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. त्यामुळे हे सत्र केवळ मार्गदर्शनापुरते मर्यादित न राहता अनुभवांचा खजिना ठरले. या कार्यक्रमास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे रायगड जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, वेदभूमी न्यूज संपादक जान्हवी भोईर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

## जगाची वाट लावणारे युद्ध

आखातात युद्ध मुळात का सुरू झाले आणि १०७ दिवसानंतर रविवारी ते का थांबले हे कोणीही सांगू शकणार नाही. युद्धामुळे इराणची पार वाट लागली. खामेनी वगैरे नेते पहिल्याच फटक्यात मारले गेले. पण तरीही आत्मसन्मानासाठी इराण लढत राहिला व अंतिमत: झुकेगा नही हे आपले वचन त्याने खरे करून दाखवले. नेतान्याहू व ट्रम्प या नरराक्षसांनी हजारो निष्पाप माणसे मारून आणि जगाची आर्थिक घडी खलास करून काय मिळवले हे त्यांचे त्यांनाही सांगता येणार नाही. खरे तर या दोन्ही नेत्यांवर युद्ध गुन्हेगार म्हणून खटले भरून त्यांना फासावर चढवायला हवे. पण ते करू शकणारा राष्ट्रसंघ आता अस्तित्वात नाही. अमेरिकेने २८ फेब्रुवारी २०२६ रोजी इराणवर हल्ले सुरू केले, त्यानंतर इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद करून जागतिक तेल पुरवठ्याला मोठा धक्का दिला. आता पाकिस्तानच्या मध्यस्थीने झालेल्या या करारानुसार, ६० दिवसांचा तात्पुरता युद्धविराम होणार आहे. १९ जून रोजी स्वित्झर्लंडमध्ये या करारावर स्वाक्षरी होणार आहे. या कराराचे स्वरूप 'तात्पुरता करार' असून, इराणच्या अणु कार्यक्रमासारखे गंभीर मुद्दे पुढील ६० दिवसांच्या तांत्रिक चर्चेसाठी राखून ठेवले आहेत. अमेरिकेचे उपाध्यक्ष जे.डी.व्हान्स यांनी सांगितले की, हा करार 'दीड पानांचा' असून, त्यात अण्वस्त्र न बनवण्याची इराणची तत्त्वतः शर्त आहे . मात्र, इराणचा अणु कार्यक्रम हा गेल्या काही वर्षांतील सर्वात वादग्रस्त मुद्दा आहे आणि ६० दिवसांत त्यावर तोडगा काढणे कठीण जाणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, इस्रायलने या कराराला पूर्णपणे नाकारले आहे. इस्रायलचे संरक्षणमंत्री यांनी स्पष्ट केले की, लेबेनॉनमध्ये इस्रायलने ताबा घेतलेल्या भूमीतून ते माघार घेणार नाहीत . इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनीही लेबेनॉन, सीरिया आणि गाझामध्ये इस्रायलची सैन्य उपस्थिती कायम राहणार असल्याचे जाहीर केले. करार जाहीर झाल्यानंतर लगेचच लेबेनॉनमध्ये इस्रायलने केलेल्या हल्ल्यांनी ही चिंता वाढवली आहे. या युद्धाचा सर्वात मोठा फटका भारताच्या अर्थव्यवस्थेला बसला. भारत आपल्या ५०% कच्च्या तेलाच्या गरजा, ७०% एलपीजी आणि ९०% एलएनजीची आयात पश्चिम आशियातून करतो. युद्धामुळे होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्याने तेलाच्या किमती १२० डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचल्या होत्या याचा परिणाम भारताच्या चलनवाढीवर झाला. मे २०२६ मध्ये चलनवाढ ४% वर पोहोचली. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जीडीपी वाढीचा अंदाज ६.६% वर खाली आणला. सरकारवर अनुदानाचा मोठा बोजा पडला खत अनुदान दुप्पट होऊन ३.८ लाख कोटी रुपयांवर पोहोचले. ग्राहकांचा विश्वास निर्देशांक ९५.७ वरून ९०.७ वर घसरला, जो 'निराशावाद' दर्शवतो. युद्धविरामाच्या घोषणेनंतर लगेचच जागतिक बाजारात तेलाच्या किमती ५% घसरल्या आणि ब्रेंट क्रूड ८३-८४ प्रति बॅरलवर आले. भारतीय रुपयाही मजबूत झाला आणि डॉलरच्या तुलनेत ०.७% वाढ झाली.

### नवी आशा

भारतीय उद्योजकांमध्ये आशा निर्माण झाली आहे. फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष एस.सी.रल्हान यांच्या मते, या करारामुळे निर्यात सामान्य होण्यास, आयात बिल कमी होण्यास आणि आर्थिक विकासाला चालना मिळण्यास मदत होईल. मुंबईतील उद्योगपती शरद कुमार सराफ यांनी तर पुढील २-३ वर्षे भारताच्या 'विकसित भारत' या स्वप्नासाठी महत्त्वाची ठरतील, असे म्हटले आहे. तथापि, तज्ज्ञ या आशावादाला 'सावध आशावाद' म्हणतात. करारामध्ये इराणच्या अणु कार्यक्रमावर नेमके काय होणार, याचा उल्लेख नसल्याने भविष्यातील वाटाघाटी कठीण होण्याची शक्यता आहे . इस्रायलचा विरोध आणि लेबेनॉनमधील संघर्ष या कराराला कुठल्याही क्षणी अडथळा आणू शकतो. ''या करारामुळे तात्पुरता दिलासा मिळेल, पण दीर्घकालीन शांतता अजूनही संशयास्पद आहे. भारताने आपली ऊर्जा धोरणे अधिक मजबूत करण्याची गरज आहे,'' असे आयझॅक सेंटर फॉर पब्लिक पॉलिसीचे संशोधक ध्रुव गोयल यांनी सांगितले. त्यांच्या अभ्यासानुसार, जूनअखेर युद्ध संपले, तरी भारताच्या तुटीत ७४,०८७ कोटी रुपयांची वाढ होणार आहे, तर डिसेंबरपर्यंत युद्ध लागले, तर तुट ४.९९% पर्यंत पोहोचू शकते. भारत सरकारने सध्या काळजीपूर्वक पावले उचलली आहेत डॉलरमधील गुंतवणूक वाढवली, विमा कंपन्यांना पाठिंबा दिला आणि तेल कंपन्यांना किमतीतील वाढ सहन करण्यास सांगितले. मात्र, जागतिक बाजारातील अनिश्चितता आणि इस्रायल-हिजबुल्लाह संघर्ष भारतासमोर नवी आव्हाने उभी करू शकतात. आता भारतासमोर मोठा प्रश्न आहे हा करार खऱ्या अर्थाने शांतता आणेल का, की फक्त थोड्या काळाचा दिलासा असेल? याचे उत्तर पुढील ६० दिवसांतील घडामोडींवर अवलंबून असेल.

### भारताने गमावलेली संधी

पाकिस्तान, सौदी अरेबिया, कतार आणि तुर्कस्तान यांनी या करारात मध्यस्थी केली, तर भारत या प्रक्रियेत कोठेही दिसला नाही, अशी टीका विरोधी पक्षांनी केली आहे .भारत सरकारने स्वतःला मध्यस्थ म्हणून सादर करण्यास स्पष्टपणे नकार दिला. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी सर्वपक्षीय बैठकीत भारत 'दलाल' राष्ट्र नसल्याचे स्पष्ट केले. पाकिस्तान अमेरिकेचा 'वापर' करत असल्याचेही त्यांनी सांगितले. ही भूमिका भारताच्या 'स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी' (रणनीतिक स्वायत्तता) या परराष्ट्र धोरणाचा भाग आहे कोणत्याही गटाशी पूर्णपणे बांधील न राहता स्वतंत्र परराष्ट्र धोरण अवलंबणे. मात्र, प्रत्यक्षात ही भूमिका 'स्ट्रॅटेजिक ॲम्बिग्युइटी' (धोरणात्मक संदिग्धता) म्हणून दिसली, जिथे भारताची भूमिका स्पष्ट नव्हती. भारताचे इराण, इस्रायल आणि अमेरिका या सर्वांशी चांगले संबंध आहेत. इराणशी ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि ऊर्जा संबंध; इस्रायलशी संरक्षण आणि तंत्रज्ञानातील विशेष धोरणात्मक भागीदारी; आणि अमेरिकेशी मजबूत व्यापार-संरक्षण सहकार्य. परंतु युद्धाच्या काळात हे सर्व संबंध सांभाळणे अवघड ठरले. इराणच्या सर्वोच्च नेत्याच्या हत्येचा निषेध करण्यास भारताने टाळाटाळ केली. परराष्ट्र सचिवांनी शोकपत्रावर स्वाक्षरी केली, पण तो उशीरा झालेला उपक्रम 'डॅमेज कंट्रोल' (नुकसान नियंत्रण) म्हणून दिसला. अगदी कालपरवा होर्मूजमध्ये एका जहाजावर अमेरिकेने केलेल्या हल्ल्यात ती खलाशी ठार झाले. पण या मृत्यूप्रकरणी शोक व्यक्त करण्याची किंवा अमेरिकेचा निषेध करण्याची हिंमत आपले पंतप्रधान दाखवू शकले नाहीत. केवळ कनिष्ठ पातळीवर हा निषेधाचा उपचार उरकण्यात आला. या बोटचेपेपणाचा फायदा चीन आणि पाकिस्तानला झाला. पाकिस्तानने स्वतःला जागतिक स्थैर्याचा भागीदार म्हणून सादर केले. रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव यांनीही सुचवले की पाकिस्तान अल्पकालीन मध्यस्थ असू शकतो, पण दीर्घकालीन शांततेसाठी भारत अधिक योग्य आहे मात्र, भारताने तोपर्यंत मैदान सोडले होते. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास आराघची यांनी भारत 'मोठी भूमिका' बजावू शकतो, असे सांगितले पण भारताने ती संधी गमावली, असे विरोधकांचे म्हणणे आहे.गेल्या काही वर्षांत अमेरिकेच्या दबावाखाली भारताने इराणशी व्यापार मोठ्या प्रमाणात कमी केला. चाबहार बंदर प्रकल्पही अमेरिकन निर्बंधांच्या सावलीत आहे. परिणामी इराणसोबतचा भारताचा व्यापार व उद्योग सहकार्य कमी झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये इस्रायलला भेट दिली. युद्ध सुरू होण्याच्या काही दिवस आधीची ही भेट इराणला नाराज करणारी ठरली. भारताने सार्वजनिकरित्या युद्धविरामाचे स्वागत केले, पण कोणत्याही बाजूचा निषेध केला नाही . 'डायलॉग अँड डिप्लोमसी'ची मागणी केली, पण ती मध्यस्थीत रूपांतरित झाली नाही. सर्वात कहर म्हणजे एकीकडे युद्धिध सुरू असताना मोदी सरकारचे उपद्व्याप काय चालू होते तर डिलिमिटेशनचे विधेयक मंजूर करून घ्या किंवा बंगालमध्ये फोडाफोडी करा.आता भारतासमोर आव्हान आहे पश्चिम आशियातील शांतता प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावणे, इराण, इस्रायल, अमेरिका यांच्याशी समतोल संबंध राखणे आणि चीन-पाकिस्तानला विरोध करणे. पुढील ६० दिवसांचा तात्पुरता करार ही भारतासाठी आपली परराष्ट्र धोरणे पुन्हा तपासण्याची संधी आहे, असे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे.

---

**विचार**

# आग, प्रशासन आणि विश्वासघात

***दिल्लीतील हॉटेलमध्ये लागलेल्या आगीत अनेक निष्पाप जीवांचा बळी गेला. परदेशी पर्यटकांचाही समावेश असल्याने या दुर्घटनेचे गांभीर्य अधिक वाढले. काही महिन्यांपूर्वीच गोव्यातील एका लोकप्रिय नाईटक्लबमध्ये लागलेल्या भीषण आगीत अनेक जण मृत्युमुखी पडले होते. नियमांचे उल्लंघन, सुरक्षा व्यवस्थेकडे केलेले दुर्लक्ष, तपासणी यंत्रणांची निष्क्रियता यातून दिसली. या घटनांकडे केवळ अपघात म्हणून पाहणे धोक्याचे ठरेल.***



**शिवाजी कराळे**

भारतातील बहुतांश शहरांमध्ये हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, मॉल्स, क्लब्स आणि व्यावसायिक संकुलांची संख्या झपाट्याने वाढत आहे. पर्यटन, व्यवसाय आणि शहरीकरणामुळे अशा आस्थापनांची गरज वाढली आहे; मात्र या वाढीच्या वेगाला सुरक्षा व्यवस्थेची साथ मिळालेली दिसत नाही. अनेक ठिकाणी अग्निसुरक्षेची साधने केवळ नियम पूर्ण करण्यासाठी बसवलेली असतात. त्यांची नियमित तपासणी होत नाही, कर्मचारी प्रशिक्षित नसतात. आपत्कालीन परिस्थितीत लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा कागदावरच अस्तित्वात असते. परिणामी, आग लागल्यावर काही मिनिटांतच परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाते. दिल्लीतील दुर्घटनेने याच वास्तवावर पुन्हा शिक्कामोर्तब केले. राजधानीसारख्या शहरात, जिथे सर्वाधिक प्रशासकीय यंत्रणा कार्यरत आहेत, तिथेही जर अशा प्रकारची दुर्घटना घडू शकते, तर देशातील इतर शहरांची स्थिती किती गंभीर असेल याची सहज कल्पना करता येते. गोव्यातील पबमधील अशाच स्वरुपाच्या अलिकडील दुर्घटनेनंतर देशभरातील हॉटेल्स आणि मनोरंजन केंद्रांची सुरक्षा तपासण्याची मागणी झाली होती. काही ठिकाणी मोहिमा राबवण्यात आल्या, नोटिसा देण्यात आल्या आणि नियमांचे पालन करण्याचे आदेश देण्यात आले; मात्र त्यानंतर काय झाले, हा प्रश्न आज अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे.

खरे पाहता, भारतात अग्निसुरक्षेसाठी कायदे आणि नियमांची कमतरता नाही. प्रत्येक व्यावसायिक इमारतीला अग्निशमन विभागाचे प्रमाणपत्र आवश्यक असते. ठराविक क्षमतेपेक्षा मोठ्या इमारतींसाठी आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग, अग्निशामक यंत्रणा, धूर नियंत्रण प्रणाली, फायर अलार्म, स्प्रिंकलर यंत्रणा आणि नियमित सुरक्षा सराव बंधनकारक आहेत. अर्थात प्रश्न नियमांचा नाही. त्यांच्या अंमलबजावणीचा आहे. अनेकदा सुरुवातीला परवानगी घेतल्यानंतर इमारतींमध्ये मोठे बदल केले जातात. अतिरिक्त बांधकामे उभी राहतात, जागेचा व्यावसायिक वापर वाढवला जातो आणि सुरक्षेच्या अटींचे उल्लंघन केले जाते. या सर्व गोष्टी प्रशासनाच्या नजरेआड कशा राहतात, हा खरा मुद्दा आहे. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. महापालिका, नगरपालिका आणि विकास प्राधिकरणे ही शहर नियोजन आणि बांधकाम नियंत्रणाची प्रमुख साधने आहेत; मात्र अनेकदा या संस्थांची कार्यक्षमता प्रश्नचिन्हाखाली येते. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या इमारती वर्षानुवर्षे उभ्या राहतात. परवान्यांचे नूतनीकरण होत राहते. काही वेळा कारवाईची नोटीस दिली जाते; परंतु प्रत्यक्षात कठोर पावले उचलली जात नाहीत. यामुळे नियम पाळणाऱ्यांपेक्षा नियम मोडणाऱ्यांनाच अधिक फायदा मिळतो. ही परिस्थिती बदलल्याशिवाय अशा दुर्घटना थांबण्याची शक्यता कमी आहे.

सर्वोच्च न्यायालयाने विविध प्रकरणांमध्ये अग्निसुरक्षेच्या प्रश्नावर अनेकदा चिंता व्यक्त केली आहे. शाळा, रुग्णालये, व्यावसायिक इमारती आणि सार्वजनिक ठिकाणांच्या सुरक्षेबाबत न्यायालयाने कठोर निर्देश दिले आहेत, तरीही अनेक राज्यांमध्ये या निर्देशांची अंमलबजावणी अत्यंत संथ गतीने होताना दिसते. न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी ही शासनाची जबाबदारी असते; परंतु अनेकदा आदेश फाईलमध्ये राहतात आणि प्रत्यक्ष कृतीपर्यंत पोहोचत नाहीत. दिल्ली आणि गोव्यातील दुर्घटना ही त्याच प्रशासकीय उदासीनतेची परिणामकारक उदाहरणे आहेत. या सगळ्यात सर्वाधिक दुर्लक्षित राहणारा विषय म्हणजे 'फायर ऑडिट'. आर्थिक व्यवहारांचे जसे लेखापरीक्षण होते, तसेच सुरक्षेचेही नियमित लेखापरीक्षण आवश्यक असते. 'फायर ऑडिट' म्हणजे केवळ अग्निशामक यंत्रे मोजणे नव्हे. त्यामध्ये संपूर्ण इमारतीची रचना, विद्युत व्यवस्था, बाहेर पडण्याचे मार्ग, आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा आणि कर्मचाऱ्यांची तयारी यांचे परीक्षण केले जाते; परंतु अनेक ठिकाणी 'फायर ऑडिट' ही केवळ औपचारिकता बनून राहिली आहे. काही कागदपत्रे पूर्ण झाली की प्रमाणपत्र मिळते आणि त्यानंतर अनेक वर्षे कोणी मागे वळून पाहत नाही. ही पद्धत बदलणे अत्यावश्यक आहे. परदेशी पर्यटकांच्या मृत्युमुळे या दुर्घटनांना आंतरराष्ट्रीय परिमाण प्राप्त झाले आहे. भारताने गेल्या काही वर्षांमध्ये पर्यटन क्षेत्राला प्राधान्य दिले आहे. देशाची सांस्कृतिक विविधता, ऐतिहासिक वारसा आणि नैसर्गिक संपदा यांचे जगभरात प्रभावीपणे विपणन केले जात आहे; परंतु पर्यटकांना आकर्षित करण्याइतकेच त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणेही महत्त्वाचे आहे.

एखाद्या परदेशी नागरिकाचा भारतातील हॉटेल किंवा पर्यटनस्थळी झालेल्या दुर्घटनेत मृत्यू झाल्याची नोंद केवळ स्थानिक बातमी म्हणून राहत नाही, तर जागतिक माध्यमांपर्यंत पोहोचते. त्याचा परिणाम भारताच्या प्रतिमेवर आणि पर्यटन उद्योगावर होतो. पर्यटन हा विश्वासावर उभा असलेला उद्योग आहे. पर्यटक एखाद्या देशात जाण्याचा निर्णय घेताना त्या देशातील कायदा-सुव्यवस्था, आरोग्य सुविधा आणि सुरक्षेचा विचार करतात. अशा दुर्घटना वारंवार घडत राहिल्या तर भारत सुरक्षित पर्यटनस्थळ म्हणून निर्माण केलेली प्रतिमा कमकुवत होऊ शकते. त्यामुळे या घटना केवळ स्थानिक प्रशासनाच्या अपयशापुरत्या मर्यादित राहत नाहीत; त्या राष्ट्रीय हिताशी संबंधित ठरतात. दुर्दैवाची बाब म्हणजे भारतात प्रत्येक मोठ्या दुर्घटनेनंतर काही दिवस संताप व्यक्त होतो, चौकशी समित्या स्थापन होतात, दोषींवर कारवाईची भाषा केली जाते आणि नंतर विषय हळूहळू विस्मरणात जातो. त्यानंतर पुन्हा एखादी दुर्घटना घडते आणि चक्र नव्याने सुरू होते. ही मानसिकता बदलल्याशिवाय परिस्थिती बदलणार नाही. अग्निसुरक्षा ही कागदी प्रक्रिया नसून सार्वजनिक सुरक्षेचा कणा आहे, याची जाणीव प्रशासन आणि व्यावसायिक आस्थापनांना करून द्यावी लागेल.

दिल्लीतील दुर्घटनांनी देशासमोर एक कठोर प्रश्न उभा केला आहे. आपण विकासाच्या नावाखाली उभ्या करत असलेल्या इमारती खरोखर सुरक्षित आहेत का? परवाना प्रणाली जनतेच्या सुरक्षेसाठी काम करते, की केवळ महसूल गोळा करण्यासाठी? न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी होते, की त्यांची केवळ नोंद घेतली जाते? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे शोधण्याची वेळ आता आली आहे. कारण प्रत्येक दुर्घटनेनंतर व्यक्त होणारे दुःख महत्त्वाचे असते; पण त्याहून महत्त्वाची असते ती त्यातून घेतलेली शिकवण. दिल्ली आणि गोव्याच्या दुर्घटनांनंतरही प्रशासन जागे झाले नाही, तर भविष्यातील प्रत्येक आग ही केवळ अपघात म्हणून नव्हे तर व्यवस्थेने केलेला विश्वासघात म्हणूनच नोंदली जाईल. भारताला सुरक्षित, जबाबदार आणि विश्वासार्ह राष्ट्र म्हणून उभे करायचे असेल तर अग्निसुरक्षेला घोषणांमधून बाहेर काढून प्रत्यक्ष कृतीत आणावे लागेल. अन्यथा, आगी विझतील, राख थंड होईल; पण निष्काळजीपणाची ठिणगी कायम पेटतीच राहील. देशातील पर्यटनाचे मुख्य केंद्र असलेल्या दिल्ली आणि गोव्यासारख्या राज्यांमध्ये परदेशी पर्यटकांनाही या अग्नितांडवात आपले प्राण गमवावे लागले. ही बाब केवळ अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न उरलेली नाही, तर यामुळे जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा कमालीची मलिन होत आहे. 'अतिथी देवो भव' चा नारा देणाऱ्या देशात परदेशी पाहुणे जर शासकीय अनास्थेचे बळी ठरणार असतील, तर आपण जागतिक महासत्ता बनण्याच्या बाता मारणे थांबवायला हवे.

कोणतीही मोठी आग लागली, की यंत्रणांना तात्पुरती जाग येते. चौकशी समित्या नेमल्या जातात, काही अधिकाऱ्यांवर निलंबनाची जुजबी कारवाई होते आणि हॉटेल सील करण्याचे नाटक केले जाते; परंतु मूळ रोगावर इलाज करण्याचे धाडस कोणीही दाखवत नाही. दिल्ली आणि गोव्याच्या घटनांमध्ये एक समान धागा दिसून येतो; तो म्हणजे नियम धाब्यावर बसवून चालवले जाणारे व्यवसाय. हॉटेल मालक आणि स्थानिक प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी यांचे साटेलोटे असल्याशिवाय हे शक्यच नाही. डोळ्यांदेखत नियम पायदळी तुडवले जात असताना महानगरपालिकेचे प्रभाग अधिकारी आणि अग्निशामक दलाचे निरीक्षक काय करत असतात, हा खरा प्रश्न आहे. दुर्घटना घडल्यावर हॉटेलमालकाला जबाबदार धरून प्रशासन आपले हात झटकून मोकळे होते; परंतु ज्या अधिकाऱ्यांनी या बेकायदेशीर कृत्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा खटला का भरला जात नाही, या प्रश्नाचे उत्तर कधीच मिळत नाही.

---

**चर्चा आजची**

# पड रं पाण्या... पड पाणी पाणी...

**राकेश लोहार**

''पड रं पाण्या... पड रं पाण्या... पड पाणी पाणी...'' अशी आर्त हाक सध्या रायगड जिल्ह्यातीलच नव्हे, तर संपूर्ण राज्यातील प्रत्येक शेतातून, प्रत्येक वाडीतून आणि प्रत्येक शेतकऱ्याच्या मनातून उमटत आहे. अर्धा जून महिना सरला, मृग नक्षत्र संपत आले, तरीही पावसाने पाठ फिरवली आहे. दरवर्षी याच काळात हिरवाईने नटणारी शेती यंदा मात्र पावसाच्या प्रतीक्षेत सुकलेल्या चेहऱ्याने आकाशाकडे पाहात उभी आहे. पावसाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत असून, संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचे परिणाम दिसू लागले आहेत.

रायगड हा जिल्हा भरपूर पावसासाठी ओळखला जातो. कोकणात पाऊस म्हणजे जूनच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू होणारी संततधार, डोंगरदऱ्यांमधून वाहणारे ओढे-नाले आणि हिरवागार निसर्ग. मात्र, यंदाचे चित्र पूर्णपणे वेगळे आहे. जूनचा अर्धा महिना उलटून गेला, तरी पावसाचे आगमन झाल्याची खात्री वाटावी अशी परिस्थिती निर्माण झालेली नाही. तुरळक सरी पडल्या, पण शेतीला आणि जलसाठ्यांना दिलासा देणारा पाऊस अद्याप झालेला नाही.

मे महिन्याच्या अखेरीस आणि जूनच्या सुरुवातीला काही भागांत हलका पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. अनेकांनी शेताची मशागत पूर्ण करून पेरणी केली. काही शेतकऱ्यांनी धुळवाफे पेरणी केली. कारण, त्याला निसर्गावर पर्यायाने पावसावर भरोसा होता. भात, नाचणी, वरी आणि इतर पिकांचे बियाणे जमिनीत टाकले गेले. सुरुवातीच्या ओलाव्यामुळे काही ठिकाणी बियाण्यांना मोडही आले. शेतात हिरव्या कोंबांनी डोके वर काढले. मात्र, त्यानंतर पावसाने अचानक दडी मारली आणि शेतकऱ्यांच्या आशांवर पाणी फिरले.

सध्या अनेक शेतांमध्ये उगवलेली कोवळी रोपे उन्हाच्या झळा सहन करत आहेत. जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असल्याने ही रोपे करपण्याची भीती निर्माण झाली आहे. जर पुढील काही दिवसांत चांगला पाऊस झाला नाही, तर मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यानंतर शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येण्याची शक्यता नाकारता येत नाही. आधीच वाढत्या उत्पादनखर्चामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी हा अतिरिक्त आर्थिक बोजा ठरणार आहे.

पावसाच्या लांबलेल्या प्रतीक्षेचा सर्वाधिक परिणाम जलसाठ्यांवर झाला आहे. रायगड जिल्ह्यातील अनेक धरणांतील पाणीसाठा अत्यंत खालावला आहे. काही धरणांनी तर अक्षरशः तळ गाठला आहे. उन्हाळ्याच्या शेवटी जेमतेम शिल्लक राहिलेले पाणी आता झपाट्याने कमी होत आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. शहरांसह ग्रामीण भागातही पाणीपुरवठ्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

गावागावांतील विहिरी कोरड्या पडल्या आहेत. अनेक ठिकाणी विहिरींची पाण्याची पातळी इतकी खाली गेली आहे की पाणी काढणेही अवघड झाले आहे. बोअरवेलमधील पाण्याचाही पुरवठा कमी झाला आहे. ज्या भागांत उन्हाळ्यात टँकरची गरज भासत नव्हती, त्या भागांतही आता टँकरची मागणी वाढू लागली आहे. महिलांना आणि ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

पावसाचा अभाव हा केवळ शेतीपुरता मर्यादित प्रश्न नाही. पशुपालनावरही त्याचे गंभीर परिणाम होत आहेत. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांचे अर्थकारण शेतीसोबत पशुपालनावर अवलंबून आहे. मात्र, पाऊस नसल्याने गवताची म्हणजेच ओल्या चाऱ्याची वाढ झालेली नाही. शेताच्या बांधावर, माळरानांवर आणि डोंगरउतारांवर दिसणारी हिरवाई अद्याप आलेली नाही. त्यामुळे गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे.

सध्या पशुपालकांना जनावरांसाठी चारा विकत घ्यावा लागत आहे. चाऱ्याचे दर वाढले असून, त्याचा अतिरिक्त आर्थिक भार शेतकऱ्यांवर पडत आहे. पाण्याअभावी जनावरांनाही त्रास सहन करावा लागत आहे. जर पाऊस आणखी लांबला, तर पशुधन टिकवणेही अनेकांसाठी आव्हानात्मक ठरू शकते.

पावसाचा उशीर हा ग्रामीण बाजारपेठांवरही परिणाम करणारा ठरत आहे. पेरणीनंतर शेतकऱ्यांच्या हातात काही प्रमाणात काम असते. शेतीशी संबंधित व्यवहार सुरू होतात. मजुरांना रोजगार उपलब्ध होतो. मात्र, यंदा पावसाअभावी अनेक कामे ठप्प पडली आहेत. त्यामुळे ग्रामीण अर्थचक्राचा वेग मंदावल्याचे चित्र दिसत आहे.

हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर अशा परिस्थितींची वारंवारता वाढत असल्याची चिंता तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. पूर्वी पावसाचे वेळापत्रक काही प्रमाणात निश्चित असे. आता मात्र कधी अतिवृष्टी, कधी दीर्घ खंड, तर कधी अवेळी पाऊस अशा टोकाच्या परिस्थिती अनुभवायला मिळत आहेत. याचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. शेतीचे संपूर्ण गणित निसर्गावर अवलंबून असल्याने प्रत्येक बदल त्यांच्यासाठी संकट घेऊन येत आहे.

आज रायगड जिल्ह्यातील शेतकरी एका आशेवर दिवस काढत आहे. प्रत्येक सकाळी आकाशाकडे नजर जाते, ढगांची चाहूल लागते का याची प्रतीक्षा सुरू असते. हवामान खात्याच्या अंदाजांवर नजर ठेवली जाते. गावागावांत पावसाच्या चर्चाच रंगत आहेत. कारण आता पडणारा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे. तो केवळ जमिनीची तहान भागवणार नाही, तर शेतकऱ्यांच्या आशांनाही नवे जीवन देणार आहे. रायगडच्या डोंगरदऱ्या, शेतमळे, ओढे-नाले आणि जलाशय सगळेच पावसाची वाट पाहत आहेत. कोरड्या पडलेल्या विहिरी, तळ गाठलेली धरणे, करपण्याच्या मार्गावर असलेली पिके आणि चाऱ्याअभावी त्रस्त झालेले पशुपालक यांची अवस्था पाहता एकच आर्त साद सर्वत्र घुमत आहे; ती म्हणजे ''पड रं पाण्या... पड रं पाण्या... पड पाणी पाणी...!'' आता तरी बरस, कारण तुझ्याशिवाय शेतकऱ्याचा संसार आणि गावागावचे जीवन दोन्हीही अडचणीत आले आहे.

---

**लोकसंसद**

## भारतातही मुलांना 'सोशल मीडिया' बंदी हवी

नुकतीच ब्रिटन सरकारने सोळा वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया वापरण्यावर बंदी घालण्याची घोषणा केली आहे. आज सोशल मीडिया हे मुलांच्या बौद्धिक आणि मानसिक विकासासाठी एक मोठे आव्हान बनले असून सायबर बुलिंग (ऑनलाइन मानसिक छळ), अश्लील मजकूर, नैराश्य आणि आभासी जगाच्या अतिरेकामुळे लहान मुलांचे भविष्य धोक्यात आले आहे. त्यांचे भावविश्व कोलमडून पडत आहे. हीच गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन आता जगभरातील अनेक देश यावर कडक पावले उचलत आहेत. सर्व प्रथम ऑस्ट्रेलियाने डिसेंबर २०२५ मध्ये १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर पूर्णपणे बंदी घालणारा ऐतिहासिक कायदा लागू केल्यानंतर ब्राझील, इंडोनेशिया आणि मलेशिया या देशांनी अशाच प्रकारचे कडक कायदे अंमलात आणून लहान मुलांना या जाळ्यातून बाहेर काढण्यास सुरुवात केली. आता ब्रिटनसह कॅनडा, ऑस्ट्रिया, डेन्मार्क, फ्रान्स, जर्मनी, ग्रीस, पोलंड, स्लोव्हेनिया, स्पेन, तुर्की इत्यादी देशही अशा प्रकरचे डिजिटल सुरक्षा विधेयक आणून १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया बंदी अंमलात आणणार आहेत. या पार्श्वभूमीवर आपल्या देशातील अल्पवयीन मुलेही समाज माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर करत असून त्यावर नियंत्रण आणण्यासाठी अशा कठोर कायद्याची गरज आहे. कारण आपल्या देशातील १६ वर्षांखालील लोकसंख्या अंदाजे ३६ ते ३७ कोटी इतकी असून ती देशाच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे २४ टक्के ते २५ टक्के इतकी आहे. देशाचे भविष्य असलेल्या या मुलांचे बालपण आणि भविष्य त्यामुळे अधिक सुरक्षित होईल.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे**

---

**दिनविशेष**

# क्रांतीसूर्य महाराणा प्रतापसिंह

भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहांचे नाव नेहमीच साहस, शौर्य, त्याग आणि हौतात्म्य यासाठी प्रेरणादायी ठरलेले आहे. मेवाडच्या सिसोदिया घराण्यात राणा हमीर, बाप्पा रावळ, राणा संग असे अनेक शूरवीर होऊन गेले. या सर्व वीरांना 'राणा' असे संबोधिले जातेच; पण प्रतापसिंहांना 'महाराणा' ही उपाधी मिळाली. महापराक्रमी अन् अपराजित राजाचा जन्म बाप्पा रावल यांच्या राजवंशात १७ जून १५४०(तिथीप्रमाणे) रोजी कुंभलगड येथे झाला अन् जणू हिंदुत्वाचा रक्षणकर्ता क्रांतीसूर्यच भारतभूमीवर उदयास आला. मेवाडचे राणा द्वितीय उदयसिंह यांना अनेक अपत्ये होती.

या सर्वात ज्येष्ठ प्रताप. प्रतापे बालपणापासूनच धीट आणि शूर होते. स्वातंत्र्य या शब्दाचा पर्यायच प्रतापसिंह व्हावा, असे त्यांचे तेजस्वी जीवन होते. प्रतापसिंहांच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर सारा भारत देश प्रभावित झाला. महाराणा प्रतापसिंहांचे नाव आजही राजस्थानात पूज्य मानले जाते. महाराणा प्रतापसिंहांनी अकबरसारख्या बलाढ्य बादशहाशी मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे लढा दिला. या लढ्यात त्यांना पत्नीला घेऊन मुलाबाळांसोबत जंगलात भटकावे लागले. हे सारे कष्ट सोसत असतानाही त्यांनी कुळाला आणि देशाच्या प्रतिष्ठेला धक्का लागू दिला नाही. त्याकाळी दिल्लीच्या तख्तावर अकबर बादशहा होता. हिंदूमधील फुटीरता आणि स्वार्थ, लोभ याचा लाभ घेत त्याने बहुतेक सर्व राजपुतांना वश करून घेतले. काही राजपूत राजांनी मानसन्मानाच्या लालचीने मुलींनाही अकबराच्या अंत:पुरात पोहोचविले होते; पण अशाही परिस्थितीत मेवाड, बुंदेलखंड आणि सिरही वंशातील काही राजे स्वाभिमान, धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढत होते. पुढे उदयसिंह मेवाडचे राजा झाले. त्यांचे स्वातंत्र्य म्हणजे आपल्या सामर्थ्याचा अपमान होय, असे अकबराला वाटे. त्याने खूप मोठी सेना पाठवून चितोडवर आक्रमण केले. उदयसिंह प्रथमपासूनच विलासी जीवनात रंगले होते. जीव वाचवण्याकरिता ते चितोड सोडून पळून गेले. आरवली पर्वतावर उदयपूर नावाची त्यांनी नवी राजधानी वसविली. चितोडच्या युद्धानंतर चार वर्षांनी म्हणजेच ३ मार्च १५७२ रोजी उदयसिंहांचे निधन झाले. प्रतापसिंहांचा राज्याभिषेक झाला. प्रतापसिंह हे राणा प्रतापसिंह म्हणून आले होते. मातृभूमीवर लागलेल्या पारतंत्र्याचा कलंक नेहमीसाठी धुऊन टाकायचा आहे. शक्तिशाली राजपुतांनो, पुढे व्हा आणि स्वातंत्र्य मिळविण्याची तयारी करा, ही ओजस्वी वाणी व प्रतापसिंहांची कठोर प्रतिज्ञा उपस्थित असलेल्या सर्व सरदारांच्या अंत:करणात उत्साहाची लहर उमटवून गेली. एकमुखाने त्यांनी घोषणा केली की, हे प्रभो, आमच्या शरीरातील रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत आम्ही चितोडच्या मुक्तीसाठी राणा प्रतापसिंहांना सहाय्य करू व त्यांच्या सोबत खांद्याला खांदा लावून लढू. आम्ही मरण पत्करू; पण ध्येयापासून हटणार नाही. राणाजी, आम्ही सर्व आपल्या पाठीशी उभे आहोत, याची खात्री ठेवा. केवळ आपल्या इशाऱ्याचाच अवकाश की, आम्ही आत्मसमर्पण करायला तयार आहोत. हळदीघाटच्या युद्धात अकबराच्या अपेक्षेनुसार निर्णायक निकाल लागला नाही. अकबराचे सैन्य प्रतापसिंहांचा पूर्णपणे पाडाव करण्यात अयशस्वी ठरले. महाराणा प्रतापसिंहांनी सैन्याची वाढ करून संपूर्ण मेवाड प्रांत कब्जात घेतला. हे कळल्यावरही अकबर बादशहाला शांतच राहावे लागले. पुन्हा महाराणा प्रतापसिंहांशी संघर्ष करण्याचे धाडस त्याने केले नाही. नंतर अकबर बादशहाने आपले सारे लक्ष दक्षिणेकडे वळविले; परंतु एवढ्या विजयानंतरही महाराणा प्रतापसिंहांचे समाधान झाले नाही. त्यांची दृष्टी चितोडवर होती. चितोड मोगलांच्या ताब्यात राहणे, हे त्यांना खटकत होते. प्रतापसिंहांचे साहस, शोर्य, चातुर्य व महापराक्रम बघून झालोर, जोधपूर, इडर, नोडोल व बुंदेलचे राजे त्यांच्या सहाय्यार्थ धावून आले व अकबर बादशहाच्या विरोधात उभे राहिले. प्रतापसिहांचे दूत सर्वदूर या संघर्षाचा वणवा पेटवित होते. एकामागून एक पर्वतासमान संकटे येत होती व त्यांच्याशी टक्कर देऊन मार्ग काढण्यात महाराणा प्रतापसिहांचे शरीर जर्जर झाले होते. १९ जानेवारी १५९७ रोजी त्यांचे निधन झाले.

# शाळा दुरुस्तीच्या प्रतीक्षेत

● विद्यार्थ्यांसह पालक वर्गामध्ये नाराजी ● प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी

| महाड | प्रतिनिधी |

मराठी माध्यमांच्या शाळांवर मागील दोन दशकांपासून आलेल्या संकटांची मालिका महाड नगरपालिकेतील शाळांवरही दिसून येत आहे. नगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या शाळेच्या इमारतींची रंगरंगोटी २०२१ च्या महापुरानंतर केला नसल्याची धक्कादायक माहिती चौकशी दरम्यान प्राप्त झाली आहे.

दरम्यान शाळा क्रमांक दोनच्या इमारतीमध्ये शाळा क्रमांक एकदेखील मागील काही वर्षापासून भरत आहे. या इमारतीची देखील मोठ्या प्रमाणावर नादुरुस्ती झाली आहे. यासंदर्भात नगरपालिकेच्या यंत्रणेकडून करण्यात आलेल्या पाहणीनंतर शाळेच्या पहिल्या दिवसापर्यंत कोणतीही दुरुस्तीची कामे पूर्ण झाली नसल्याची माहिती देण्यात आली आहे.




महाड नगरपालिकेच्या एक प्राथमिक उर्दू शाळेसह पाच मराठी माध्यमांच्या शाळा आहेत. या सर्व मिळून सुमारे साडेतीनशे विद्यार्थी-विद्यार्थिनी या ठिकाणी शिकत आहेत. शाळेच्या पहिल्या दिवशी नगरपालिका शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांचे स्वागत विशिष्ट पद्धतीने करण्यात आले असून सर्व शाळांमधून याची जय्यत तयारी करण्यात आली होती, अशी माहिती शाळांच्या सूत्रांकडून देण्यात आली.

तसेच, शासनाकडून देण्यात येणारी शालेय पुस्तके प्राप्त झाली असून शाळेच्या पहिल्या दिवशी या शाळांमधून विद्यार्थी विद्यार्थिनींना वाटप केल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, महाड नगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या सर्व इमारतींची रंगरंगोटी तसेच स्ट्रक्चरल ऑडिट करणे आवश्यक असल्याचे पालक वर्गाचे मत आहे. यापूर्वीच नगरपालिका प्रशासन केलेल्या पाहणीनुसार शाळा क्रमांक एकची इमारत नादुरुस्त झाल्याने तेथील विद्यार्थ्यांची व्यवस्था शाळा क्रमांक दोनमध्ये करण्यात आली आहे. मात्र येथील इमारतीची पूर्णपणे दुरुस्ती होणे आवश्यक असून पावसाळ्यात कौले खराब झाल्याने पाणी आत शिरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

विद्यार्थ्यांसाठी बाकी आवश्यक असलेल्या तांत्रिक बाबी परिपूर्ण असल्या तरीही शाळेची इमारतीची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. तसेच २०२१ च्या महापुरापासून नगरपालिकेच्या सर्व शाळांच्या रंगरंगोटीची कामे हाती घेण्यात न आल्याने पालक वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे.

सर्व शाळांची रंगरंगोटी व शाळा क्रमांक दोन व एक इमारतीची दुरुस्ती करावी, अशी किमान अपेक्षा या शाळांतील माजी विद्यार्थी, शिक्षणप्रेमी नागरिक तसेच पालक वर्गाकडून नगरपालिका प्रशासनाला करण्यात येत आहे.

### लोकप्रतिनिधींनी लक्ष द्यावे

मागील चार वर्षात नगरपालिका प्रशासन प्रशासनामार्फत चालवले जात होते. मागील तीन महिन्यापासून लोकनियुक्त लोकप्रतिनिधी पालिकेमध्ये कार्यरत असल्याने या लोकप्रतिनिधींकडून या शाळांची सध्याची असलेली स्थिती लक्षात घेऊन तातडीने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१७ जून

१) श्री. विजया गजानन चव्हाण चेंढरे, अलिबाग, १७-६-१९३४
२) श्रीम.कांता मगनलाल भारद्वाज अलिबाग, १७-६-१९३६
३) श्रीम.शशिकला पांडुरंग कांबळी अलिबाग, १७-६-१९४२
४)श्री.लिलाधर नरहरि पाटील मु.बांधण अलिबाग १७-६-१९४४
५)श्री.चंद्रकांत बाळाराम पाटील अलिबाग, १७-६-१९५२

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

### शालेय जीवनातील नव्या पर्वाला प्रारंभ

**खोपोली :** 'स्कूल चले हम' हे ब्रीदवाक्य गुंनगुनत प्रत्येक शाळकरी विद्यार्थी आनंदाने शाळेच्या दिशेने सरकताना पाहायला मिळाले. सोमवार १५ जून रोजी चेहऱ्यावर दिसणारं कुतुहल आणि मनात असणारी भिती असं वातावरण प्रत्येक शाळेच्या गेटवर होते. उन्हाळ्याच्या मोठ्या सुट्टीनंतर १५ जूनला शाळा सुरू झाल्या असून पहिल्या दिवशी मुलांना शाळेत सोडताना पालकांच्या मनातही हुरहूर होती. हे वातावरण खालापूर तालुक्यातील ग्रामीण भागासह शहरी भागातील सगळ्याच शाळांमध्ये पाहायला मिळाले. आपल्या मुलांच्या शाळेचा पहिलाच दिवस म्हणून पालकांनी आपल्या लाडक्या चिमुरड्याला शाळेत नेऊन सोडलं. पहिल्यांदाच शाळेत प्रवेश घेतलेल्या काही चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर थोडी भीती होती आणि कुठे रडारड. विद्यार्थ्यांना फूल, चॉकलेट्स, विविध शालेय उपयोगी वस्तू देऊन खालापूर तालुक्यातील शाळेमध्ये स्वागत करण्यात आले.




## नव्या शैक्षणिक वर्षाचा उत्साहपूर्ण प्रारंभ

| खांदा कॉलनी| प्रतिनिधी|

पनवेल महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सोमवारी (दि.१५) नव्या शैक्षणिक वर्षाची उत्साहात सुरुवात झाली. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे औक्षण, पुष्पगुच्छ देऊन तसेच टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. लहानग्यांच्या रंगीबेरंगी पावलांच्या ठशांनी शाळेचा परिसर सजला होता. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी स्वागत रॅलीही काढण्यात आली. नव्या दप्तरांसह आणि चेहऱ्यावर आनंद घेऊन शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांमुळे परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे शाळेचा पहिला दिवस संस्मरणीय ठरला.

## नाट्यांकुर नाट्य महोत्सवाला उदंड प्रतिसाद

| चिरनेर | प्रतिनिधी |

शालेय रंगभूमीवर उद्याचे तारे घडतील, असा विश्वास संदेश महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र म्हात्रे यांनी व्यक्त केला. इंदिरा गांधी महाविद्यालय आणि संदेश विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यमाने माटुंगा मुंबई येथील यशवंतराव चव्हाण नाट्य संकुलामध्ये गुरुवारी (दि.११) नाट्यांकुर नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.




राज्यस्तरीय व मुंबई विभागीय नाट्य स्पर्धेत संदेश विद्यालयाने संगीत एच टू ओ, मिसेस लक्ष्मी, होता जीवा म्हणून वाचला शिवा, पाकिस्तानचं यान या चार एकांकिकांचे स्पर्धेत सादरीकरण केले होते. या चारही एकांकिका प्रथम क्रमांकाच्या मानकरी ठरल्या आहेत. या चारही एकांकिकांच्या नाट्य कलाकृतीचे सादरीकरण शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्यासह नाट्य रसिकांना पाहता यावे, यासाठी नाट्यांकुर नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. एकांकिकांमधून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. त्यांना नवी दिशा मिळते. संदेश विद्यालय सांस्कृतिक चळवळीचे प्रतीक असून या विद्यालयाच्या रंगभूमीवर आज नवोदित कलाकार आत्मविश्वासाने उभे राहत आहेत. समाज प्रबोधन करणाऱ्या या एकांकिकांमधून कलाकारांनी आपल्या अभिनयातून समाजातील विविध प्रश्न, नातेसंबंध, संघर्ष मूल्य व वास्तव मांडत, विविध सामाजिक, आशयघन एकांकिकांमधून कलाकारांनी विचार प्रवर्तक कलाकृतीतून आपल्या अभिनयाची ताकद सिद्ध केली. यावेळी कलाकारांच्या अभिनयात एक प्रामाणिकपणा जाणवला.

## गोवे शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

| कोलाड | प्रतिनिधी|

राजिप शाळा गोवे येथे शाळा प्रवेशोत्सवासाठी इयत्ता १ली वर्गासाठी दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पहिले पाऊल-शाळा पूर्वतयारी मेळावा क्र.२ चे आयोजन मोठ्या उत्साही वातावरणात करण्यात आला.



सर्व प्रथम लेझिम नृत्याद्वारे, पुष्पवृष्टी करत दाखलपात्र विद्यार्थ्यांना शाळेत आणण्यात आले. फुगे व शैक्षणिक किट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व मोफत गणवेशाचे वाटप शाळा व्यवस्थापण समिती सदस्य व उपस्थित पालकवर्गाच्या हस्ते करण्यात आले.

यानंतर वृक्ष लागवडीचे महत्व ओळखून अंगणवाडी सेविका सुरेखा जाधव यांच्या हस्ते शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच सर्व दाखल पात्र विद्यार्थ्यांचे फोटो काढून इयत्ता १ लीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे घेण्यात आले. कागदावर आपल्या पायाचे ठसे पाहून मुले आनंदीत झाली.

## तीन शाळांसाठी कूपनलिका

### ● रोटरी दिशा ट्रस्टकडून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्याचे शेवटचे टोक असलेल्या झगरेवाडी शाळा तसेच तालुक्यातील अन्य दोन शाळांसाठी डोंबिवली येथील रोटरी दिशा ट्रस्ट यांच्या वतीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करून देण्यात आली आहे. तीन शाळांसाठी कूपनलिका खोदून देण्यासाठी आर्थिक मदत या संस्थेने केली आहे.

रोटरी दिशा ट्रस्ट, डोंबिवली यांच्या माध्यमातून भिवपुरी रोड रेल्वे स्टेशनजवळील चिंचवली येथील मतिमंद शाळेतील मुलांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करून देण्यात आली आहे. मिटते कूपनलिका खोदून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली असून तब्बल २ इंच इतके मुबलक पाणी त्या कूपनलिकेत साठून आहे. रोटरी दिशा ट्रस्टच्या माध्यमातून झुगरेवाडी आणि मेंगाळवाडी शाळेतही देखील कूपनलिका खोदून घेण्यात आली आहे.



## राऊत हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन येथील रविंद्र ना. राऊत माध्यमिक शाळेत २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी इयत्ता ५ वीमध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या मुला-मुलींचे शाळा समितीचे सभापती जितेंद्र सातनाक यांच्या हस्ते गुलाब पुष्प व खाऊ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच इयत्ता पाचवी ते आठवीचे विद्यार्थ्यांना सातनाक, शाळा समितीचे सदस्य दत्तात्रय कोसबे, माजी प्रा. नंदा जोशी प्रा. संदीप भगत आदींच्या हस्ते शासनाकडून आलेली पाठ्यपुस्तके देण्यात आली. तसेच एस.एस.सी. परीक्षेत प्रथम आलेल्या पाच विद्यार्थ्यांचाही भेटवस्तु देऊन गौरव करण्यात आला. यावेळी केलेल्या आपल्या मनोगतात शाळेकडून विद्यार्थ्यांना नेहमीच सहकार्य केले जाते. तरी आपली गुणवत्ता विद्यार्थ्यांनी नेहमी वाढतीच ठेवावी, असे आवाहन केले. यावेळी प्राचार्य संदीप भगत, संदीप गुरव व अन्य शिक्षकगण उपस्थित होते.

## आदिवासी पाड्यावर शिक्षणाचा नवा दीप

### ● सारथी फाउंडेशनकडून पाचव्या शाळेचा जीर्णोद्धार

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

रायगड किल्ल्याच्या कुशीत वसलेल्या निजामपूर परिसरातील अतिदुर्गम आदिवासी पाड्यावर सारथी फाऊंडेशनने आणखी एका शाळेचा जीर्णोद्धार पूर्ण करून ग्रामीण व आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे नवे दालन खुले केले आहे. सामाजिक कार्यकर्ते शहाजीराव सवदे व रेखा सवदे यांच्या आर्थिक योगदानातून साकारलेल्या या शाळेचे उद्घाटन १३ जून रोजी माजी राज्यमंत्री व माजी आ.रमेश शेंडगे यांच्या हस्ते करण्यात आले.



निजामपूर परिसरातील धरणग्रस्त आदिवासी वस्तीवर गेल्या अनेक वर्षांपासून मूलभूत सुविधा आणि शैक्षणिक साधनांचा अभाव होता. १९५६मध्ये उभारलेली शाळा कालांतराने पूर्णपणे जीर्ण झाली होती. मोडकळीस आलेल्या इमारतीत विद्यार्थ्यांना दाटीवाटीने शिक्षण घ्यावे लागत होते. पावसाळा आणि वादळी वाऱ्यांमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला होता. ही परिस्थिती लक्षात घेऊन सारथी फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक जंगले यांनी शाळेच्या पुनर्बांधणीचा पुढाकार घेतला. त्यांच्या नेतृत्वाखाली फाउंडेशनने स्थानिक लोकसहभाग आणि दानशूर व्यक्तींच्या मदतीने शाळेचा संपूर्ण जीर्णोद्धार केला. नव्या इमारतीत प्रशस्त वर्गखोली, वीज जोडणी, पंखे, ट्यूबलाईट आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, शहाजीराव सवदे यांनी आपल्या मातोश्री हिराबाई सवदे आणि वडील अन्नाप्पा चंदू सवदे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या शाळेसाठी आर्थिक सहाय्य केले. सारथी फाउंडेशनने या नव्या शाळेसह फाउंडेशनने आतापर्यंत पाच शाळांचे जीर्णोद्धार पूर्ण केल्याची माहिती संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

पहिलीच्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत | मोफत गणवेशासह पाठ्यपुस्तकांचे वाटप

# बैलगाडी ठरली शाळा प्रवेशोत्सवाचे आकर्षण

| पाली /बेणसे | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील नवघर शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात अत्यंत दिमाखात आणि उत्साही वातावरणात झाली. नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी शाळेत 'शाळा प्रवेशोत्सव' आणि 'शाळापूर्व मेळावा' मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. यावेळी पहिलीत दाखल होणाऱ्या चिमुरड्यांचे स्वागत करण्यासाठी अवघी नवघर शाळा सजली होती. प्रवेशोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरली ती नवघर गावच्या पारंपरिक थाटात सजवलेली बैलगाडी.




पहिलीच्या वर्गात नव्याने प्रवेश घेणाऱ्या मुलांना या आकर्षक बैलगाडीत बसवून, पुढे लेझीम आणि ढोल-ताशांच्या तालावर वाजत-गाजत संपूर्ण गावातून मिरवणूक काढण्यात आली. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत सुवासिनींनी नवीन विद्यार्थ्यांचे औक्षण केले. तसेच 'पहिले पाऊल' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या पायांचे ठसे घेऊन, त्यांना पुष्प व खाऊ देऊन शाळेत प्रेमाने प्रवेश देण्यात आला.

हा संपूर्ण सोहळा यशस्वी करण्यासाठी नवघर ग्रामपंचायतीचे सरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व कमिटी सदस्य, माजी विद्यार्थी संघ, शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक वृंद यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्वांच्या उत्कृष्ट नियोजन आणि पुढाकारामुळे नवघर शाळेच्या नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात अत्यंत 'दणक्यात' आणि संस्मरणीय झाली.

### सेल्फी विथ मॉम!

शाळापूर्व मेळाव्यादरम्यान उभारण्यात आलेल्या खास सेल्फी पॉईंटवर आई आणि पाल्यांचे फोटो काढण्यात आले. आपल्या लाडक्या मुलाला पहिल्या दिवशी शाळेत सोडताना पालकांच्या, विशेषतः मातांच्या चेहऱ्यावरचा आनंद या सेल्फीच्या माध्यमातून कॅमेऱ्यात कैद झाला.

### विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन

शाळेच्या पहिल्याच दिवशी शासनाच्या योजनेअंतर्गत सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश आणि शूज यांचे वाटप करण्यात आले. अभ्यासाच्या गोडीसोबतच मुलांची जीभही गोड व्हावी, यासाठी दुपारच्या भोजनात सर्व विद्यार्थ्यांना विशेष मिष्ठान्नाचा लाभ देण्यात आला.

## निवडक



### कामेरकर विद्यालयात शाळा प्रवेशोत्सव

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील माणगाव शहरात बामणोली रोड परिसरात असणारे रायगड शिक्षण संस्था संचलित 'भास्करदादा कामेरकर विद्यालय' म्हणजेच पूर्वाश्रमीचे माध्यमिक विद्यालय माणगाव या शिक्षणसंस्थेने अनेक कुशल विद्यार्थी घडवण्याचे काम मागील २६वर्षांपासून अविरत सुरू ठेवले आहे. विद्यार्थ्यांचा बुद्ध्यांक वाढवून त्यांना स्पर्धापरीक्षापुरक आणि शिस्तप्रिय विद्यालय म्हणून माणगाव तालुक्यातील 'भास्करदादा कामेरकर विद्यालय' अशी या शिक्षणमंदिराची ओळख आहे. यावर्षी या विद्यालयात इयत्ता ५ वी प्रवेशासाठी पालक आणि विद्यार्थी यांचा ओघ लागला आहे. यावर्षी शाळेने ५ वी इतर वर्गातील नवीन विद्यार्थी प्रवेशाचा सुमारे ९९ टक्के टप्पा पार केला आहे. यावर्षी शाळेत नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शाळा प्रवेशोत्सव २०२६ या कार्यक्रमात इयत्ता पाचवी व इतर इयत्ताच्या विद्यार्थ्यांचे पुष्पवृष्टी आणि तोंड गोड करून शाळेकडून स्वागत करण्यात आले. इवलेसे रोप लावलीये द्वारी.. या उक्तीप्रमाणे रुग्णसेवा करत सामाजिक सेवा, शिक्षणसेवा कशी करता येईल, या ध्येयाने प्रेरित झालेले माणगावमधील निष्णात शल्यचिकित्सक डॉ संतोष. भा. कामेरकर या संस्थेचे अध्यक्ष यांनी आपले शैक्षणिक कार्य अविरत चालू ठेवले आहे.




### शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

**खांब :** रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या विविध शाळेत शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख उपस्थितीत संस्थेच्या श्री. रा.ग. पोटफोडे (मास्तर) विद्यालय खांब, श्रमिक विद्यालय चिल्हे व न्यू इंग्लिश स्कूल विठ्ठलवाडी-राजखलाटी या तिन्ही शाळेत साजरा करण्यात आलेल्या प्रवेशोत्सव कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष प्रकाश थिटे, सचिव धोंडू कचरे, संचालक रामचंद्र चितळकर, राम मरवडे, धनाजी लोखंडे, वसंत मरवडे, मुख्याध्यापक दिपक जगताप, आर. के. म्हात्रे, गौतम जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने पालकवर्ग उपस्थित होते. यावेळी उपस्थितीत विद्यार्थी वर्गाचे गुलाब पुष्प, नोटबुक, पेन व खाऊ देऊन मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. तसेच नवागत विद्यार्थी वर्गाच्या पालकांनाही भेटवस्तू देऊन त्यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला. इंग्रजी विषयाचे ज्ञान ही काळाची गरज आहे. ती गरज पूर्ण करून आपली मुले जगाच्या व्यावहारिक ज्ञानात कुठेही कमी पडू नये, यासाठी मराठी माध्यमाच्या दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचीच खरी गरज असल्याचे प्रतिपादन चेअरमन महेंद्र पोटफोडे यांनी केले.



### मुलांना पुस्तके, वह्यांचे वाटप

**वाघ्रण :** राजिप शाळा वाघ्रणमध्ये १५ जून रोजी शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमात नवीन विद्यार्थी व पालकांचे लेझीम वाजवीत स्वागत करण्यात आले. यावेळी मुलांना पुस्तके, वह्या, शुज आदी वाटप करण्यात आले. यावेळी व्यासपीठ आयोजित करण्यात आले होते. मुख्याध्यापिका सुजाता गुंजाळ यांनी प्रास्ताविक शुभदा पाटीलसह शिक्षिकानी स्वागत केले. यानंतर शिक्षण तज्ञ कृष्णकांत पाटील, माजी विद्यार्थी, संच उपाध्यक्ष, पत्रकार दिपक यशवंत पाटील, विषय तज्ञ प्रशांत ठाकूर यांची मनोगते झाली. सरपंच राजेंद्र पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्यने उपस्थित होते.



### वृक्षारोपणाने शैक्षणिक वर्षाची सुरुवात

**पाली/गोमाशी :** नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा वाघोशी येथे नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे उत्साही आणि पर्यावरणपूरक वातावरणात स्वागत करण्यात आले. सोमवारी (दि.१५) शाळेच्या पहिल्याच दिवशी लहानग्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला. या विशेष प्रसंगी शाळेत प्रवेश करणाऱ्या इयत्ता पहिलीच्या सर्व नवीन विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे हार्दिक स्वागत करण्यात आले. तसेच या नवागतांना केवळ शाब्दिक शुभेच्छा न देता, एक उत्तम संदेश देत प्रत्येकाला वृक्ष भेट देण्यात आली. यानंतर दाखल झालेल्या सर्व नवीन विद्यार्थ्यांच्या हस्ते शाळेच्या परसबागेत मोठ्या उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले. लहान वयातच मुलांमध्ये निसर्गाविषयी आवड आणि पर्यावरणाचे भान निर्माण व्हावे, या उद्देशाने हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष सन्माननीय कविता देशमुख, सदस्या सुगंधा गोळे, शिक्षक वृंद तसेच मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होता. उपस्थित मान्यवरांनी आणि पालकांनी शाळेच्या या स्तुत्य उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# कर्जतमध्ये धूमधडाक्यात प्रवेशोत्सव

**2030 विद्यार्थ्यांचा पहिलीत प्रवेश**

**स्वागतासाठी फुगे, पताका, फुलांची सुंदर सजावट**



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात जिल्हा परिषद शाळांचा पहिला दिवस आज मोठ्या धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. तालुका २७१ जिल्हा परिषद शाळांमध्ये तब्बल २०३० नवीन विद्यार्थ्यांनी इयत्ता पहिलीत प्रवेश घेतला. तर शाळेच्या पहिल्या दिवशी सर्व १०० टक्के विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके आणि गणवेशांचे वाटप करण्यात आले.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना शाळेची ओढ लागावी आणि आनंदी वातावरणात त्यांचे स्वागत व्हावे, यासाठी राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागामार्फत दरवर्षी शाळा प्रवेशोत्सव साजरा केला जातो. हा उपक्रम विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये राबविला जातो.

शाळा प्रवेशोत्सवाची मुख्य उद्दिष्टेपटनोंदणी वाढवणे तसेच शाळाबाह्य मुलांना शोधून त्यांची शाळेत १०० टक्के नोंदणी करणे. शाळेची गोडी निर्माण करणे तसेच मुलांच्या मनात शाळेबद्दलची भीती दूर करून त्यांना आनंदाने शाळेत येण्यासाठी प्रोत्साहित करणे यांच्यासह मुलींच्या शिक्षणाला चालना देणे आणि शिक्षणातील गळती थांबवणे लोकसहभाग घेणे आदी उद्दिष्ट समोर ठेवण्यात आली होती.तालुक्यातील सर्व २७१ शाळांमध्ये शाळा प्रवेशतोसव साजरा करण्यात आला.

प्रवेशोत्सवानिमित्त सोमवारी पहिल्या दिवशी शाळेमध्ये प्रभातफेरी काढून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. गावातून किंवा परिसरातून प्रभातफेरी काढून पालकांमध्ये शिक्षणाबाबत आवड निमार्ण करण्यात आली. स्वागत आणि सजावट करताना शाळेला फुगे, पताका आणि फुलांची सजावट करून प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांचे औक्षण केले जाते.

> पटनोंदणी वाढवणे आणि गावातील किंवा परिसरातील एकही मूल शाळाबाह्य राहणार नाही याची खात्री करणे आणि १०० टक्के पटनोंदणी साध्य करणे असून आम्ही आतापर्यंत २०३० विद्यार्थ्यांची नोंदणी केली आहे. अजून काही विद्यार्थी प्रवेश घेणार असून शाळा बाह्य विद्यार्थी राहणार नाही याची काळजी घेतली जाईल.
>
> –अनंत खैरे
> शिक्षण अधिकारी

विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, शैक्षणिक साहित्याचे वाटप केले जाते. आकर्षक मध्यान्ह भोजन देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या आनंदासाठी पहिल्या दिवशी शाळेच्या जेवणात गोड पदार्थांचा समावेश केला होता. पालक आणि अधिकारी संवाद तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी,अधिकारी आणि शिक्षक विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी उपस्थित होते.



## साखर शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद शाळा साखर येथे सोमवारी (दि. १५) जून रोजी प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या नवागतांचे प्रभातफेरी काढून तसेच गुलाब पुष्प, चॉकलेट देऊन मोठ्या दिमाखात स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी मुलांना मान्यवरांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तक, गणवेश तसेच शूज वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी उपशिक्षणाधिकारी कुमार जपकर, जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार गोविंद वाकडे, आक्षी ग्रामपंचायत सरपंच रश्मी पाटील, सदस्य निरजा नाईक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य हरेश्वर गोतकर, अंकिता भुकवार, रेश्मा तांडेल, भावना जगू, दर्शना बुरांडे, जय बुरांडे, प्रसाद पाटील, हिना जगू, उमा तांडेल, कोमल गण, सुनिता गोतकर, अमोली साटविलकर, मनिषा गुरव तसेच मुख्याध्यापक राजेंद्र पाटील, शिक्षिका स्मिता चिखले आदी उपस्थित होते. उपशिक्षणाधिकारी जपकर यांनी पटसंख्या चांगली असल्याबद्दल तसेच विद्यार्थी गुणवत्तेबद्दल समाधान व्यक्त केले.

## निवडक



### हमरापूर प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव

**हमरापूर :** पेण तालुक्यातील हमरापूर प्राथमिक शाळेत शाळेच्या पहिल्याच दिवशी प्रवेशोत्सव उत्स्फूर्तपणे साजरा करण्यात आला. या उत्सवाला पेण पंचायत समिती सभापती स्मिता पाटील, गट शिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे, केंद्रप्रमुख प्रमोद पाटील, उपसरपंच सायली मांडलेकर, ग्रामपंचायत सदस्य व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष युवराज म्हात्रे यांनी भेट दिली. यावेळी हमरापुर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक विठोबा पाटील, शिक्षिका मंदाकिनी म्हात्रे, सुनंदा खाडे, माजी सरपंच प्रदीप म्हात्रे, मोरेश्वर नाईक, प्रकाश भगत, सुरेश एनपुरे यांच्यासह पालक वर्ग उपस्थित होते. यावेळी विदयार्थ्यांना शालेय गणवेश तसेच पुस्तके मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आली.



### विद्यार्थ्यांचे भेटवस्तू देऊन स्वागत

**उरण :** रयत शिक्षण संस्थेच्या मॉडर्न स्कूल व ज्युनियर कॉलेज, वाशी येथे सोमवारी (दि.१५) जून रोजी इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत भेटवस्तू देऊन करण्यात आले. यावेळी विद्यालयाच्या प्राचार्या सुमित्रा भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास पालक, स्कूल कमिटीचे सदस्य तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. यामध्ये ए. बी. वाघ, हाना सरेला, मनीषा संकपाळ, कुमार भोईर, सरिता वर्मा, अविनाश कांबळे, निलेश हिरवे, कविता बैले, भाग्यश्री कांबळे, पंढरीनाथ माळी, तुषार म्हात्रे, सुहास गावंड, कैलास पाटील, अनिका एस, वीणा सावंत इयत्ता पाचवीचे वर्गशिक्षक, इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### माथेरानमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप

**माथेरान :** नगरपरिषदेच्या वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेत पहिलीच्या वर्गात बारा मुलांनी प्रवेश घेतला. यावेळी नगरपरिषदेत प्राथमिक शाळा आणि गव्हाणकर ट्रस्ट या दोन्हीही शाळेतील एकूण ३०० विद्यार्थ्यांना प्रगती मित्र मंडळ, कांदिवली(मुंबई) यांच्या वतीने शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या हस्ते थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी नितीन नथवाणी, भावेश मेहता, निलेश गुरडीया, डॉ. गिरीश त्रिवेदी, राज कावा, उर्मिलाबेन कावा, दिलीप अहिरे, लक्ष्मण ढेबे, संतोष चाटसे, सचिन भोईर, अमोल अंधारे, साक्षी कदम, मनिषा चौधरी, सोनल ढेबे, वनिता कदम यांसह पालकवर्ग उपस्थित होते.

## उन्हाळी सुट्टीनंतर पुन्हा किलबिलाट



**। सोगाव । प्रतिनिधी ।**

उन्हाळ्याच्या पडलेल्या सुट्टीनंतर प्राथमिक शाळा व अंगणवाडीमध्ये १५ जूनपासून लहान मुलांच्या किलबिलाटाने शाळा गजबजून गेल्या. लहान चिमुकल्यामध्ये 'कही खुशी तर कही गम' पाहायला मिळाला. काही मुले-मुली आनंदात आले, तर काही रडत आले.

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासाठी गोडी निर्माण व्हावी यासाठी यावेळी सोगाव येथील उर्दू व मराठी प्राथमिक तसेच ऊर्दू हायस्कूल येथील शाळेत आलेल्या सर्व मुलांना मुनवली येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांनी स्वखर्चाने शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या साहित्याचे वाटप माजी ग्रामपंचायत सरपंच सुनिल थळे, सदस्य, सदस्या आणि सामाजिक कार्यकर्ते व इतर मान्यवरांच्या हस्ते पहिल्याच दिवशी करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व चॉकलेट, गणवेश, पुस्तके देऊन स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी माजी उपसरपंच समद कुर, लाईक कप्तान, सानिका घाडी, लाईक कप्तान, जमातुल मुस्लिमिन सोगावचे मुरतुजा कुर, सतिश घाडी, सचिन घाडी, अक्षय जाधव, दिलीप मोंढे, मनिष खाडे, संजय अनमाने, संजय जाधव, मयूर अनमाने, प्रतिक पाटिल, सार्थक अनमाने, गौरव मोंढे, सुरेश राऊत, उदय घरत व इतर पालकवर्ग, सोगाव, मुनवली, चोरोंडे येथील महिला व पुरुष ग्रामस्थ, शाळा समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष व इतर सर्व सदस्य, शिक्षक, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जे.एस.एम. महाविद्यालयात मरणोत्तर नेत्रदान जनजागृती




**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, जे.एस.एम. महाविद्यालय, अलिबाग आणि जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात जागतिक दृष्टीदान सप्ताहनिमित्त १० ते १६ जून नेत्र तपासणी शिबीर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सोनाली पाटील यांनी भूषविले होते.

यावेळी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रविण गायकवाड, डॉ. पंकज घरत, प्रा. अश्विनी आठवले, नेत्र चिकित्सा अधिकारी श्रद्धा कुदळे, प्रियांका गोगटे अक्षयकुमार गोरे तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी व एन. एस. एस. स्वयंसेवक उपस्थित होते.

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. डॉ. गौतम पाटील यांनी सदर नेत्र तपासणी शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सोनाली पाटील यांनी स्वतः मरणोत्तर नेत्रदानासाठी संकल्प पत्र भरून दिले व विद्यार्थ्यांना तसेच प्राध्यापकांना नेत्रदानासाठी प्रेरित केले.

नेत्र तपासणी शिबिरात १५ प्राध्यापकांनी नेत्र तपासणी करून घेतली तसेच मरणोत्तर नेत्रदानासाठी संकल्प पत्र भरले. तसेच एकूण ४५ विद्यार्थ्यांनी नेत्र तपासणी करून घेतली. नेत्रतपसणी नंतर चिकित्सा अधिकारी श्रीमती श्रद्धा कुदळे यांनी विदयार्थी व प्राध्यापकांना आवश्यकतेनुसार वैद्यकीय मदत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी आठवले यांनी केले, तर उपस्थितांचे आभार महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रविण गायकवाड यांनी मानले.

### गुणवंतांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवसेना शाखा वावंढळ- चौकतर्फे गुणवंत विद्यार्थी सत्कार व शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रम वैशाली खैर, सुहास कदम, निखिल मालुसरे, नाना पवार यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमास विलास कदम, विष्णू खैर, गिरीश कदम, गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थी, पालक, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'विद्यार्थ्यांच्या भविष्याला मिळेल चालना'



**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहा शहरातील हनुमान नगर येथील गीतराज म्हस्के मित्र मंडळ यांच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी रोहा नगर पालिकेच्या नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी विद्यार्थी हा धागा पकडून गीत म्हस्के समाजाचे काहीतरी देणेकरी लागतो या उद्देशाने त्यांचे कार्य चालू असल्याचे सांगितले.

याप्रसंगी गितराज म्हस्के, नरे बुवा, कृष्णा म्हस्के, वसंत जाधव, अनिल पवार, कृष्णा शिंदे, संदीप वैद्य, राजू गुजर, गोटीराम मलुसरे, वासुदेव कदम, धोंडिबा कदम, प्रज्योती मळेकर, रिना थळे, साधना लाड, पद्मजा दळवी, वसुंधरा भोईर, सोनाली म्हस्के, दया धनावडे, मोहिनी म्हस्के, मंगल चोरगे, प्रमिला ढेबे आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निखिल शिर्के, अजिंक्य जाधव, अनिकेत पवार, मयूर मालुसरे, यश केंडे, वेदांत थळे, योगीराज म्हस्के, शुभम चव्हाण, राकेश पाशिलकर, परेश गोविलकर, विजय शेडगे, सुभाष चव्हाण, किरण कासकर, योगेश मानकर, तेजस साळवी, प्रथमेश चव्हाण, सौरभ भोईर, सागर कासकर, गणेश नरे, अमित ठाकूर, रमेश कदम आदींनी मोलाचे सहकार्य केले.

### कांबे शाळेत विद्यार्थ्यांचे औक्षण

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

राजिप शाळा कांबे येथे शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमाअंतर्गत नवागतांना वाजत-गाजत शाळेत आणण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले. यावेळी खाऊ वाटप, पाठ्यपुस्तके वाटप, गणवेश वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमास मनोजकुमार पवार पुरवठा निरीक्षक अधिकारी, खालापूर, चांभार्ली ग्रामपंचायतीचे सरपंच प्रतिप पाटील, ग्रामपंचायत सदस्य मनोहर म्हात्रे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष धर्मेंद्र म्हात्रे, उपाध्यक्षा गोंधळी, पालक उपस्थित होते.

## खालापूरात प्राथमिक शाळेत विद्यार्थांचे स्वागत



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

नवागत विद्यार्थ्यांना लागणाऱ्या शैक्षणिक सुविधा मोफत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आम्ही घेतली असून या नवागत विद्यार्थी यांचे मनापासून स्वागत करताना त्यांच्या पालकांचे अभिनंदन, असे सरपंच सुहास कदम यांनी प्रवेशोत्सवनिमित्त सांगितले.

१५ जून रोजी प्राथमिक शाळांचा पहिला दिवस होता. या नवागत विद्यार्थी यांचे वावंढळ शाळेत स्वागत करताना ते बोलत होते. यावेळी विद्यार्थ्यांचे स्वागत औक्षण करून, पुष्पगुच्छ, चॉकलेट, भेटवस्तू देऊन सुहास कदम, शाळेतील शिक्षक, शाळा समिती, ग्राम पंचायत सदस्यांनी मोठ्या उत्साहाने केले.

नवागत विद्यार्थ्यांचा शाळेतील प्रवेश हा प्रत्येक मुलासाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करून त्यांच्यात शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी राज्यभरात शाळांमधून प्रवेशोत्सव आयोजित केला जातो.

पहिल्याच दिवशी मुलांचे शाळेत औक्षण करून, फुगे किंवा चॉकलेट देऊन स्वागत केले जाते, जेणेकरून त्यांची शाळेची सुरुवात आनंददायी होईल. विद्यार्थ्यांमध्ये शाळेची गोडी निर्माण होते. प्राथमिक शाळा वावंढळ येथे विलास कदम, योगिता पाटील, अर्जुन कदम, नाना पवार, शिक्षकांनी नवागत विद्यार्थी यांचे स्वागत केले.

## विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने विद्यालय बहरले



**। उरण । प्रतिनिधी ।**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्याच दिवशी तुकाराम हरी वाजेकर ज्युनिअर कॉलेज, फुंडे येथे विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. विद्यालय परिसर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने आणि आनंदी चेहऱ्यांनी बहरून गेला. प्राचार्य बबन साळुंखे, उपमुख्याध्यापिका संगीता थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित स्वागत समारंभात विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. प्रवेशोत्सव कार्यक्रमास या कार्यक्रमास प्रा. किशोर पाटील, प्रा. झुंझार माने, प्रा. ऋषिकेश धुरी, सर्व ज्युनिअर कॉलेज शिक्षक उपस्थित होते.

**रासळ आदिवासीवाडी शाळेत 'प्रवेशोत्सव'** **'एक पेड माँ के नाम' उपक्रम**

## आनंदी वातावरणात शिक्षणाचा श्रीगणेशा

**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद शाळा, रासळ आदिवासी वाडी येथे नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची सुरुवात अत्यंत जल्लोषात आणि अनोख्या उपक्रमांने करण्यात आले. पहिल्याच दिवशी सोमवारी शाळेत पाऊल ठेवणाऱ्या नवोदित चिमुकल्यांचे स्वागत करण्यासाठी संपूर्ण शाळा परिसर सजला होता. नवातांना ओवाळून, त्यांची आरती करून आणि गुलाबपुष्प देऊन त्यांचे आपुलकीने स्वागत करण्यात आले. या भावनिक आणि उत्साही क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी विद्यार्थ्यांचे पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळेच्या पहिल्याच दिवशी शासनाच्या धोरणानुसार सर्व विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. हातात नवीन आणि रंगीबेरंगी पुस्तके पडताच मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. चिमुकले लगेचच पुस्तकांची पाने उलटून त्यातील चित्रे न्याहाळण्यात दंग झाले होते. तसेच विविध सेवाभावी संस्थांच्या मोलाच्या सहकार्यातून विद्यार्थ्यांना दर्जेदार दप्तरे, वह्या आणि संपूर्ण वर्षासाठी लागणारे आवश्यक लेखन साहित्य मोफत



उपलब्ध करून देण्यात आले. पहिल्याच दिवशी सर्व सोयी-सुविधा मिळाल्यामुळे पालकांनीही शिक्षकांचे आभार मानले.

दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यांना गोड जेवणाचा आस्वाद देण्यात आला. त्यानंतर शिक्षकांनी आयोजित केलेले मनोरंजनात्मक खेळ, गप्पागोष्टी, फुगे आणि आवडता खाऊ या सर्व आनंददायी वातावरणात मुलांचा पहिला दिवस कधी संपला. अशा प्रकारे आदिवासी वाडीतील मुलांच्या चेहऱ्यावरील हा आनंद आणि उत्साह पुढील शैक्षणिक वर्षात नक्कीच यशाची नवी शिखरे सर करेल, अशी आशा या निमित्ताने व्यक्त होत आहे.

या सर्व उपक्रमांची नियोजन मुख्याध्यापिका स्मिता जगताप व शिवानी पाखरे यांनी केले.

**सामाजिक उपक्रमांची जोड**

केवळ शालेय सण साजरा न करता, याप्रसंगी सामाजिक व पर्यावरण पूरक उपक्रमांची जोड देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी व परिसराविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी 'स्वच्छतेची शपथ' हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत, 'एक पेड माँ के नाम' या मोहिमेतर्गत उपस्थित पालकांच्या हस्ते शाळा परिसरात उत्साहाने वृक्षलागवड करण्यात आली.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- दुकानगाळा भाड्याने मिळेल. ९४२३३७५१९८
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. ऑल राऊंडर कुक (कॉंटिनेंटल सुद्धा येणे आवश्यक) रेस्टॉरंट कॅप्टन, मेन्टेनन्स पर्सन, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मोबा. ७५५९१८४६१२
- Office staff required Graduates can call for interview. Trainee undergraduates required. Call 9150717038

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# भारत-श्रीलंका सामन्यात राडा!

## वैभव सूर्यवंशी आणि श्रीलंकन खेळाडूंमध्ये धक्काबुक्की

**। कोलंबो । वृत्तसंस्था ।**

भारत अ आणि श्रीलंका अ यांच्यातील रोमहर्षक झुंज केवळ निकालामुळेच नाही, तर मैदानावर झालेल्या वादावादीमुळेही चर्चेचा विषय ठरली आहे. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या सामन्यात सुपर ओव्हरनंतर श्रीलंकेने बाजी मारली, मात्र विजयानंतर दोन्ही संघांच्या खेळाडूंमध्ये जोरदार धक्काबुक्की झाल्याने मैदानात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

**सुपर ओव्हरचा थरार आणि पराभवाचा धक्का**

निर्धारित ५० षटकांच्या खेळात दोन्ही संघांनी प्रत्येकी २६५ धावा केल्याने सामना टाय झाला. त्यानंतर सुपर ओव्हरमध्ये श्रीलंकेने विजयासाठी १७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. भारताकडून वैभव सूर्यवंशी आणि सूर्यांश शेडगे मैदानात उतरले. अखेरच्या तीन चेंडूवर १४ धावांची गरज असताना वैभवला केवळ ७ धावाच करता आल्या आणि भारताने हा सामना गमावला. पराभवाच्या पदरी पडलेल्या निराशेतून आणि मैदानावरील तणावातून वादाची ठिणगी पडली.



### सूर्यवंशीचा संताप

सामना संपल्यानंतर श्रीलंकेचे खेळाडू विजयाचा जल्लोष करत असतानाच, भारतीय सलामीवीर वैभव सूर्यवंशी आणि श्रीलंकेच्या एका क्षेत्ररक्षकामध्ये शाब्दिक चकमक उडाली. या वादाचे रूपांतर बघता-बघता धक्काबुक्कीत झाले. वैभवचा संताप इतका अनावर झाला होता की, त्याने श्रीलंकेच्या खेळाडूला धक्का दिला, ज्याला प्रत्युत्तर म्हणून तिकडूनही तसेच कृत्य झाले. अखेर सूर्यांश शेडगे आणि श्रीलंकेच्या इतर खेळाडूंनी मध्यस्थी करत दोघांनाही एकमेकांपासून दूर केले. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे.

### अंधूक प्रकाश आणि वादाची पार्श्वभूमी

मैदानावर निर्माण झालेल्या या तणावामागे खराब प्रकाशयोजनेचे कारण असल्याचे बोलले जात आहे. सामन्याच्या शेवटच्या टप्प्यात प्रकाश कमी असल्याने अंपायर सुपर ओव्हर घेण्यास तयार नव्हते, ज्यावरून भारताचा कर्णधार तिलक वर्मा आणि अंपायर यांच्यात बराच काळ वादावादी झाली होती. तत्पूर्वी, नाणेफेक जिंकून श्रीलंकेने भारताला फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते. सूर्यांश शेडगे आणि विप्रज निगम यांच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर भारताने ४९.२ षटकांत २६५ धावा उभारल्या. प्रत्युत्तरात अरशदच्या भेदक गोलंदाजीमुळे श्रीलंकेलाही ५० षटकांत ९ गड्यांच्या मोबदल्यात २६५ धावांपर्यंतच मजल मारता आली.

## युझवेंद्र चहलचे २९ चेंडूंत शतक!

**नवी दिल्ली :** युझवेंद्र चहल याने पीटरसनने दिलेले चॅलेंज पूर्ण केले. पीटरसनने ५० चेंडूंत शतक झळकावण्याचे आव्हान दिले होते, परंतु पठ्ठ्याने २९ चेंडूंतच ते पूर्ण केले. वेगाने चेंडू टाकण्याची सुरूवात झाली आणि ती प्रत्येक चेंडूनंतर १ ने वाढत गेली. ४० मीटरवर चौकार होता आणि चहलने पहिलाच चेंडू षटकार खेचला. दुसऱ्या चेंडूवरही त्याने षटकार खेचला. तिसऱ्या चेंडूवरही त्याचा तोच प्रयत्न होता, परंतु सुदैवाने त्याचा झेल टाकला गेला. त्यानंतर चहलने षटकारांचा पाऊस पाडला. त्याने १४ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले.१६व्या चेंडूवर तो पुन्हा झेलबाद झाला आणि त्याच्या धावसंख्येतील ५ गुण वजा केले गेले. २०व्या षटकातही झेलबाद झाल्याने त्याची धावसंख्या ५६ अशी झाली. पण, त्यानंतर तो थांबला नाही आणि २५ चेंडूंत तो ९० धावापर्यंत पोहोचला. २९ व्या चेंडूवर षटकार मारून त्याने शतक पूर्ण केले.

# निवडक

## वैभवच्या बॅटला लागलं ग्रहण


**नवी दिल्ली :** आयपीएलच्या हंगामात धडाकेबाज फलंदाजी करणारा वैभव सूर्यवंशी आता भारतीय अ संघाकडून खेळतोय. भारतीय अ संघ सध्या श्रीलंकेत ट्राय सिरीज खेळत असून इथं आतापर्यंत तीन सामन्यात वैभव सूर्यवंशीची बॅट जशी तळपायला पाहिजे होती तशी तळपलेली नाही. दांबुलाच्या मैदानावर सुरू असलेल्या आजच्या श्रीलंकेविरूद्धच्या सामन्यात वैभवने तीन चौकार आणि एक षटकार मारत दमदार सुरूवात केली. त्याने १४ चेंडूत २१ धावा केल्या. मात्र त्यानंतर श्रीलंकेचा कर्णधार सहान अराचिग याने त्याला आपल्या फिरकीच्या जाळ्यात खेचलं. मात्र त्याला बॉल टाईम करता आला नाही. त्याने चेंडू थेट वानूजाच्या हातात मारला.गेल्या काही सामन्यात वैभव सूर्यवंशीची कामगिरी त्याच्या लौकिकास साजेशी होत नाहीये. त्याने गेल्या तीन सामन्यात १४, ४४ आणि २१ धावा केल्या आहेत. आयपीएलमधील त्याची फलंदाजीची आकडेवारी आणि आताची आकडेवारी यात खूप फरक दिसत आहे. आयपीएलमध्ये वैभव सूर्यवंशीने गोलंदाजांची यथेच्छ धुलाई केली होती. त्याने दिग्गजांचे चेंडू स्टेडियमच्या कोपऱ्या कोपऱ्यात पोहचलवले होते. भारताकडून खेळताना मात्र वैभवची कामगिरी खालावत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील दबाव हा वेगळा असतो. त्याचबरोबर श्रीलंका आणि अफगाणिस्तानच्या गोलंदाजांनी वैभव विरूद्ध चांगली रणनिती आखली होती. त्यांना वैभवचा उधळलेला वारू आवरण्यात यश आलं.

## दीप्ती शर्मा रचणार विक्रम

**नवी दिल्ली :** टीम इंडियाची अनुभवी फिरकीपटू दीप्ती शर्मा हीने आयसीसी वुमन्स टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात धमाका केला. दीप्तीने १४ जून रोजी पाकिस्तान विरुद्ध दुसऱ्या डावात ५ विकेट्स घेतल्या. दीप्तीने या ५ विकेट्स घेत भारताच्या विजयात प्रमुख योगदान दिलं. दीप्तीने या ५ विकेट्स घेण्यासह मोठा वर्ल्ड रेकॉर्ड ब्रेक केला. दीप्तीने टी २० क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेण्याची कामगिरी केली. त्यानंतर आता दीप्तीच्या निशाण्यावर आणखी १ वर्ल्ड रेकॉर्ड आहे. दीप्तीला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड ब्रेक करण्याची संधी आहे. झुलनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ३५५ विकेट्स मिळवल्या आहेत. त्यानंतर दीप्ती शर्मा ३५४ विकेट्ससह दुसऱ्या स्थानी आहे. त्यामुळे दीप्तीला झुलनचा वर्ल्ड रेकॉर्ड ब्रेक करण्यासाठी फक्त २ विकेट्सची गरज आहे. दीप्ती पुढच्याच सामन्यात हा विक्रम आपल्या नावावर करु शकते. टीम इंडिया वर्ल्ड कप मोहिमेतील आपला दुसरा सामना हा नेदरलँड्स विरुद्ध खेळणार आहे.तसेच दीप्तीने पाकिस्तान विरुद्ध ५ विकेट्स घेण्यासह आणखी मोठी कामगिरी केली. दीप्तीने टी २० क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट्सचा वर्ल्ड रेकॉर्ड ब्रेक केला. दीप्तीने याबाबतीत थायलँडच्या थिपाचा पुथावोंग हीचा वर्ल्ड रेकॉर्ड ब्रेक केला.तसेच दीप्ती पाकिस्तान विरुद्ध आणखी एक विक्रम केला. दीप्ती भारत-पाकिस्तान यांच्यातील टी २० सामन्यांमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणारी गोलंदाज ठरली. दीप्तीने पाकिस्तान विरुद्ध आतापर्यंत एकूण ११ विकेट्स मिळवल्या आहेत. याआधी हा विक्रम टीम इंडियाच्या एकता बिष्ट आणि पाकिस्तानच्या निदा डार हीच्या नावावर होता. या दोघींनी एकमेकांविरुद्ध प्रत्येकी १०-१० विकेट्स मिळवल्या होत्या. त्यामुळे आता दीप्ती पाकिस्ताननंतर नेदरलँड्स विरुद्ध आणखी एक वर्ल्ड रेकॉर्ड करणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## प्रभावशाली व्यक्तींची यादी जाहीर

न्यूयॉर्क : टाइम मॅगझिनने पहिल्यांदाच क्रीडा जगतातील १०० सर्वात प्रभावशाली व्यक्तींची यादी जाहीर केली आहे. याच्या मुखपृष्ठावर चार वेळा एनबीए चॅम्पियन राहिलेल्या लेब्रॉन जेम्सला स्थान मिळाले आहे. भारतीय महिला क्रिकेटची सलामीवीर स्मृती मंधाना व्यतिरिक्त मेस्सी, रोनाल्डो आणि हालंडसारखे फुटबॉलपटू देखील यात समाविष्ट आहेत. अशा निवडक नेत्यांना जाणून घ्या, जे खेळाच्या माध्यमातून व्यवसाय, संस्कृती आणि समाजावर प्रभाव टाकण्यासोबतच खेळाच्या सीमा ओलांडून जगाला नवी दिशा देत आहेत.डावखुरी सलामीवीर सतत नवनवीन विक्रम रचत आहे. घरगुती एकदिवसीय सामन्यात द्विशतक झळकावले. तिन्ही फॉरमॅटमध्ये शतक झळकावणारी पहिली भारतीय महिला ठरली. १७ आंतरराष्ट्रीय शतकांसह एका वर्षात १,००० पेक्षा जास्त एकदिवसीय धावा करणारी पहिली महिला आहे. आरसीबीला २०२४ आणि २०२६ चे डब्ल्यूपीएल विजेतेपद मिळवून दिले. महिला वर्ल्ड कप २०२५ तिच्या उपकर्णधारपदाखाली जिंकला. ४१ वर्षांच्या वयातही एनबीएच्या सर्वोच्च स्तरावर खेळत आहेत आणि विक्रम मोडत आहेत. २२ ऑल-स्टार निवडी, एनबीएचे सर्वाधिक स्कोअरर यासह अनेक विजेतेपदे जिंकली.



## कार्तिक जोशीची ऐतिहासिक धाव

**मुंबई :** प्रसिद्ध अल्ट्रा-एंड्युरन्स ॲथलीट कार्तिक जोशी याने ऐतिहासिक प्रोजेक्ट २ अंतर्गत २,००० किलोमीटरचा टप्पा यशस्वीपणे पार केला आहे. कारगिल ते कन्याकुमारी अशा ४२०० किलोमीटरच्या कठीण मोहिमेत कार्तिकने आता महाराष्ट्रात प्रवेश केला असून, मुंबई आणि ठाण्यातील धावपटूंनी त्याचे जलोषात स्वागत केले.२५ वर्षांचा कार्तिक जोशी हा इंदूरचा रहिवासी असून, त्याच्या नावावर अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विक्रम आहेत. आशिया आणि ओशनिया १०० किमी चॅम्पियनशिपचा तो रौप्यपदक विजेता आहे. स्केचर्सच्या सहकार्याने सुरू असलेल्या या मोहिमेला त्याने २ मे २०२६ रोजी कारगिल युद्ध स्मारकावरून हिरवा झेंडा दाखवला होता. ५५ दिवसांत ४,२०० किमी अंतर कापून विक्रम रचण्याचा त्याचा मानस आहे.कार्तिकने हिमालयातील उंच आणि खडतर रस्ते, बदलणारे हवामान आणि कठीण भूप्रदेशाचा सामना करत दररोज सरासरी ७० ते ८० किलोमीटर धावण्याचा पराक्रम केला आहे. १८ व्या दिवशी दिल्ली गाठेपर्यंत त्याने ९३३ किमी अंतर पार केले होते. २,००० किमीचा टप्पा ओलांडून तो महाराष्ट्रात पोहोचला आहे.

## जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा सिडको समाज मंदिर, दुसरा मजला, सेक्टर १८, नवीन पनवेल येथे शिवछत्रपती पुरस्कार विजेते संजय सुदाम कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ दिपक निकम यांच्या शुभहस्ते करण्यात आला. नवशिक्या मुलींमध्ये इरा डाडवाल, अनुष्का जाधव, स्नेहा जाधव, आध्या आनंद, नवशिक्या मुलांमध्ये आराध्य पार्टे, मानस वर्तक, कुशाग्र सिन्हा, जस्तेज सिंग, ११ वर्षांखालील मुलींमध्ये अनुष्का जाधव, भूमिका नेटकर, ११ वर्षांखालील मुलांमध्ये विहान मंदार पुरोहित, रियान म्हात्रे, कुशाग्र सिन्हा, १३ वर्षांखालील मुलींमध्ये धृती गोयल, आराध्या धेंडे, आराध्या शेट्टी, १३ वर्षांखालील मुलांमध्ये अद्वैत पाटील, विहान अंबास्था, १५ वर्षांखालील मुलींमध्ये त्रिशा पावशे, अर्निशा भावर,१५ वर्षांखालील मुलांमध्ये आदित्य जोग, नील राठोड, १७ वर्षांखालील मुलींमध्ये त्रिशा पावशे,अर्निशा भावर, १७ वर्षांखालील मुलांमध्ये सोहम तावडे, पार्थ बगौली, १९ वर्षांखालील मुलींमध्ये अर्निशा भावर, त्रिशा पावशे, १९ वर्षांखालील मुलांमध्ये नील राठोड, रेयांश साहू, पुरुष खुला गटामध्ये पियंकुश बोस, लोकेश पाटवा, अतुल देशमुख, स्नेहील सारंगी, महिला खुला गटामध्ये सुषमा मोगरे,त्रिशा पावशे आणि पुरुष व्हेटरन्स गटामध्ये लोकेश पाटवा यांनी प्रथम व मनीष सकलानी यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. सदर स्पर्धेत नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील नामवंत खेळाडू सहभागी झाले होते. विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम व प्रमाणपत्र आणि आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले आहे. स्पर्धेचे चीफ रेफरी डी.आर. साळसकर व शामल तसेच योगेश पवार यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली होती.




## बॉक्सिंगमध्ये पनवेलकर चमकले

**पनवेल :** जळगाव येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्य बॉक्सिंग स्पर्धा २०२६ मध्ये पनवेलमधील एमपीएसए बॉक्सिंग क्लबच्या खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कौशल्याच्या जोरावर पुन्हा एकदा यशाची मोहोर उमटवली आहे. मुख्य प्रशिक्षक अद्वैत शेंबवणेकर यांच्या कुशल व खंबीर मार्गदर्शनाखाली उतरलेल्या या चमूने स्पर्धेत घवघवीत यश संपादन करत विविध पदकांची कमाई केली आहे.

या राज्यस्तरीय स्पर्धेत एमपीएसए क्लबच्या सई कारंडे आणि विहंग पालवे यांनी सुवर्ण पदक पटकावले. त्याचप्रमाणे बतुल साखरवाला हिने रौप्य पदक मिळवले, तर अहाना सोमण हिने आपल्या जिद्दीच्या जोरावर कांस्य पदक जिंकून क्लबच्या शिरपेचात आणखी एक मानाचे पदक जोडले. या सुवर्ण यशासोबतच सई करंडे हिची आगामी राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी अधिकृत निवड झाली आहे. या दैदिप्यमान यशामागे प्रशिक्षक अद्वैत शेंबवणेकर यांचे अथांग परिश्रम आणि त्यांनी खेळाडूंकडून करून घेतलेली कसून तयारी कारणीभूत आहे.



## बारामतीच्या लेकीची भारताच्या जर्सीपर्यंत झेप

**। इंदापूर । वृत्तसंस्था ।**

बारामती तालुक्यातील सावळ गावची कन्या जान्हवी जीवन वीरकर हिची भारतीय महिला अंडर-१९ क्रिकेट संघात श्रीलंका दौऱ्यासाठी निवड झाली असून, या यशामुळे बारामती तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

बारामतीच्या क्रीडा इतिहासात प्रथमच सावळसारख्या ग्रामीण भागातील एका मुलीने भारतीय महिला अंडर-१९ संघात स्थान मिळवत राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. जान्हवीच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे संपूर्ण बारामती तालुका, सावळ गाव आणि क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ज्ञानसागर गुरुकुल, सावळ येथील विद्यार्थिनी असलेल्या जान्हवीने इयत्ता पाचवीपासून क्रिकेट खेळात सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि शिस्तबद्ध सरावाच्या जोरावर विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. तिच्या अथक प्रयत्नांचे फलित म्हणून तिला भारतीय महिला अंडर-१९ संघात स्थान मिळाले आहे. जान्हवीच्या यशामागे तिचे आई-वडील, प्रशिक्षक, शिक्षक आणि कुटुंबीयांचे मोठे योगदान आहे. आगामी श्रीलंका दौऱ्यात ती दमदार कामगिरी करत देशाचे नाव उज्वल करेल, असा विश्वास ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.

बारामतीच्या लेकीची भारताच्या जर्सीपर्यंत झेप ही केवळ एका खेळाडूची यशोगाथा नसून, ग्रामीण भागातील मुलींना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा जान्हवीने दिली आहे, असे प्रतिपादन ज्ञानसागर गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सागर मानसिंग आटोळे यांनी केले.

**भारतीय महिला अंडर-१९ क्रिकेट संघात सावळच्या जान्हवीची निवड**



## पिंच्याक सिल्याट स्पर्धेत रायगड संघाचे यश

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

१६ व्या राज्यस्तरीय पिंच्याक सिल्याट या स्पर्धेचे आयोजन इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनच्या मार्गदर्शनाने महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशनने सर्वेश्वर महादेव ट्रस्टच्या इनडोअर हॉल, तपोवन- नाशिक येथे तीन दिवस करण्यात आले होते.

सर्व वयोगटातील खेळाडूंसाठी असलेल्या या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यातील ४३० खेळाडू सहभागी झाले होते. स्पर्धेचा बक्षीस समारंभ १३ जून रोजी सायंकाळी पाच वाजता आयोजित करण्यात आला होता.

३५ सुवर्ण, १० रौप्य पदक, ३ कांस्य पदक मिळवून ठाणे जिल्ह्याने प्रथम क्रमांकाची ट्रॉफी मिळवून आपले स्थान अबाधित ठेवले. २३ सुवर्ण, ८ रौप्य पदक व ६ कांस्य पदक मिळवून सांगली जिल्हाने दुसऱ्या क्रमांचे स्थान मिळवले. तर १९ सुवर्ण, १२ रौप्य व ८ कांस्य पदक मिळवून रायगड जिल्ह्याने तिसऱ्या क्रमांकाचे स्थान मिळवले तसेच १४ सुवर्ण, ८ रौप्य आणि १५ कांस्य पदके मिळवून यजमान नाशिक जिल्ह्याने चौथा क्रमांक पटकावला. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातून ३० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता आणि १९ सुवर्ण, १२ रौप्य व ८ कांस्य पदक पटकावली.

सुवर्ण पदक विजेत्या रायगड संघाच्या खेळाडूंमध्ये नेहा दोरे ३ सुवर्णपदक, रियांश सारले, शिवशांत सारगे, अनिश पालकर, श्रेयश शेडगे प्रत्येकी २ सुवर्ण पदक तर जय गोळे, श्रीशा रेवले, शौर्य वाघमारे, श्रीयश शेडगे, प्रांजळ खारपुडे, प्रीत माळी, एक सुवर्ण पदक मिळालेल्या खेळाडूंमध्ये राकेश पवार, रोहित गायकवाड, अनुज सरनाईक, मयंक नाकटे रौप्य पदक विजेत्या खेळाडूंमध्ये हर्ष पाटील २ पदक, १ रौप्य पदक विजेत्या खेळाडूंमध्ये सर्वांश सारले, शौर्य धसाडे, जय कुलकर्णी, प्रांजळ खारपुडे, अनिश पालकर, पीयूष साळुंखे, ओमकार साळुंखे, श्रेयश शेडगे, प्रशांत सारगे, रोहित गायकवाड, कांस्य पदक विजेत्यांमध्ये हनी मोदी, श्रीयश शेडगे, शौर्य धसाडे, अभिरुद्रप्रताप राय, आदर्श पटेल, अंश म्हात्रे, अर्णव वादळ, प्रशांत सारगे, जय गोळे यांचा समावेश आहे.



## पराभवांमुळे अडचणीत वाढ

**नवी दिल्ली :** इंडिया ए टीमचा ट्राय नॅशन ए सीरिजमध्ये सलग दुसरा पराभव झाला. टीम इंडियाला अफगाणिस्तान विरुद्ध पराभूत व्हावं लागलं होतं. तर भारताला श्रीलंकेविरुद्ध सुपर ओव्हरमध्ये पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे आता टीम इंडियाला स्पर्धेतील आव्हान ठेवण्यासाठी अफगाणिस्तान विरूद्धचा सामना जिंकावा लागणार आहे.

## नीरज चोप्राचे दोहा डायमंड लीगमधून पुनरागमन

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सलग दोन ऑलिंपिकमध्ये पदक पटकावणारा भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा हा दोहा डायमंड लीगमधून पुनरागमन करणार आहे. ही स्पर्धा येत्या १९ जून रोजी पार पडणार आहे.

नीरज चोप्रा २०२५ मधील १८ सप्टेंबर रोजी झालेल्या जागतिक स्पर्धेमध्ये सहभागी झाला होता. त्यानंतर तो आंतरराष्ट्रीय स्पर्धांपासून दूर आहे. दुखापतीमुळे तो स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकला नाही.सोशल माध्यमावर नीरज चोप्राच्या दोहा डायमंड लीगमधील सहभागाबाबत माहिती देण्यात आली. दरम्यान, भारतीय ॲथलेटिक्स संघटनेकडून राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय संघातील खेळाडूंची नावे जाहीर करण्यात आली. यामध्ये नीरज चोप्राची निवड करण्यात आली, पण त्याला पात्रता निकष पूर्ण करावा लागणार आहे, अशी अट टाकण्यात आली. आता दोहा येथील स्पर्धेमध्ये त्याचा सहभाग निश्चित झाला आहे. या स्पर्धेमधून तो पात्रता निकषाची अट पूर्ण करु शकणार आहे.




**अमरावतीच्या कुमकुमने तुर्कीत रचला इतिहास** | **वर्ल्ड कपमध्ये भारताला मिळवून दिलं गोल्ड**

# दक्षिण कोरियाला ५-१ ने धोबीपछाड!

**। अमरावती । वृत्तसंस्था ।**

तुर्की येथील अंतालिया येथे ९ ते १४ जून २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या आर्चरी वर्ल्ड कप स्टेज-३ (धनुर्विद्या विश्वचषक) स्पर्धेत भारतीय संघाने चमकदार कामगिरी करत सुवर्णपदकावर नाव कोरले आहे.

अमरावतीच्या खेलो इंडिया केंद्राची प्रशिक्षणार्थी कुमकुम मोहोड हिने भारतीय संघातील धीरज बोम्मादेवरा राय याच्यासह मिक्स्ड टीम (मिश्र संघ) प्रकारात अंतिम सामन्यात दक्षिण कोरियाचा ५-१ अशा सेट फरकाने पराभव करून भारताला हे ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवून दिले आहे.

अमरावती येथील खेलो इंडिया धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्रात मागील आठ वर्षांपासून राज्य क्रीडा मार्गदर्शक प्रफुल्ल डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करणाऱ्या कुमकुमच्या या सातत्यपूर्ण आंतरराष्ट्रीय यशामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचा गौरव वाढला आहे..तसेच यापूर्वीही चीन येथे झालेल्या आर्चरी वर्ल्ड कप स्टेज-२ स्पर्धेत तिने भारतीय महिला संघाचे प्रतिनिधित्व करताना सुवर्णपदक जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. कुमकुमच्या या यशाबद्दल जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी तिचे विशेष अभिनंदन केले आहे.

उपसंचालक तथा जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रमोद चांदुरकर आणि अध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे यांनीही शुभेच्छा दिल्या आहेत. कुमकुमची सध्याची प्रगती आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सातत्य पाहता ती आगामी स्पर्धांमध्येही भारताला आणखी पदके मिळवून देईल, असा विश्वास तिचे प्रशिक्षक प्रफुल डांगे यांनी व्यक्त केला असून कुमकुम आता जुलै २०२६ मध्ये स्पेन येथे होणाऱ्या वर्ल्ड कप स्टेज-४ आणि जपान येथे होणाऱ्या २० व्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)